छात्र
# प्रबोधन

मासिक पत्रक
वर्ष २, अंक ५
सौर मार्गशीर्ष, शके १९१५

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात

ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक !



## ● या अंकात काय दडलंय ? ●


- वाघीणीच्या समोर ........ २
- एकांकिका – मानवतेचे पाईक आम्ही ........ ५
- शब्दरूप आले मुक्या वेदनेला ........ ११
- नाट्यछटा – बनी शाळेला जाते ........ १३
- निबंध लेखनात सुधारणा कशा कराव्यात ........ १५
- असे घटते सुंदर अक्षर – भाग ४ ........ १७
- एकांकिका – रंग ऋतूचे ! ऋतू रंगाचे ! ........ २६
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास – संवेदनशीलता ........ २९
- स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास – ‘अस्मिता भाषेची...रचना देशाची’ ........ ३१
- रहस्यकथा – ‘तीन विद्यार्थ्यांचे साहस’ – उत्तरार्ध ........ ३४
- ‘प्रबोधकांचे मेळावे’ : ........ ३६


**भरपूर व्यायाम करा ! ‘प्रबोधन’च्या मेळाव्यांमध्ये सहभागी व्हा !**

## ✿ संवाद ✿

प्रिय प्रबोधक मित्र-मैत्रिणींनो,

छात्र प्रबोधनच्या दीपावली विशेषांकाने तुमची दीपावलीची सुट्टी नक्कीच रंगतदार झाली असणार! त्यातली शुभेच्छापत्रे, शब्दकोडी तयार करून पाठवणार ना ! काही जणांची छान छान शुभेच्छा पत्रे मिळालीत बरं का!

येता महिना मोठा उत्साहाचा जाणार! शाळेमध्ये स्नेहसंमेलनाचे वारे वाहू लागतील. त्यामध्ये तुम्ही सर्वांनी आवर्जून भाग घ्यायचा बरं. मला सगळ्यांसमोर यायची बोलायची भीती वाटते, असल्या सबबी आता तुम्ही सांगून चालणार नाही. या अंकात एकांकिका, १ नाट्यछटा दिली आहे. त्या अथवा त्यातील कल्पना वापरून स्वत: तयार केलेल्या एकांकिका, नाटक, नाट्यछटा, गाणी या संमेलनात जरूर सगळ्यांसमोर सादर करा. तुम्हाला मिळालेली विविध बक्षिसे आम्हालाही कळवायची बरं! तुमच्याइतकाच आनंद आम्हालाही होईल.

शाळेतलं वातावरण जसं मोकळं उत्साहाचं आनंदाचं असतं तसंच निसर्गातलं वातावरणही खूप प्रसन्न असते. हिवाळ्यामध्ये भरपूर व्यायाम करूनही फारसे थकल्यासारखे वाटत नाही. भूकही भरपूर लागते. शरीराची उत्तम, बांधणी होण्यासाठी हिवाळ्याचे येते तीन महिने वाया घालवून कसे बरे चालेल! दिवसाला अर्धा तास तरी मस्त व्यायाम अन् अर्धा तास मनसोक्त खेळणं व्हायला हवं. पळणे, दोरीच्या उड्या, सायकलींग, पोहणे टेकडी चढणे, जोर, बैठका, कुस्ती खेळणे इ. प्रकारच्या व्यायामांमधून तर कबड्डी, खो खो, फूटबॉल, बास्केटबॉल, हॉकी इ. खेळांमधून शरीर तंदुरुस्त ठेवा. आहारातही भिजवलेले दाणे, मोड आलेली कडधान्ये, दूध इ. गोष्टी असायला हव्यात. एकूणात 'भरपूर व्यायाम अन् मजबूत सकस आहार' हे या महिन्याचे ब्रीदवाक्य लक्षात ठेवा अन् कृतीत आणा!

पुणे व सांगली येथे या महिन्यात ग्रंथालयांना प्रारंभ होईल. येत्या तीन महिन्यांमध्ये विविध ठिकाणी मेळावे होतील त्या सर्वांमध्ये तुम्ही सहभागी व्हालच. कमी उपस्थितीमुळे तंबूतील शिबिर रद्द करावे लागले. त्याचे निश्चितच वाईट वाटले. यापुढे असे कार्यक्रम रद्द करावे लागणार नाहीत यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करू यात.

शरीर सतेज सुदृढ होण्यासाठी अन् संमेलनातील यशस्वी सहभागासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

**सस्नेह तुमचा,**

**महेन्द्र सेठिया**

# ● वाघीणीच्या समोर ●

– डॉ. विवेक कुलकर्णी

*“मे महिन्यातील एक रात्र, रणथंबोर व्याघ्र प्रकल्पाच्या अभयारण्यात बारा फुटावरच्या उघड्या मचाणावर मी आणि हॉस्टेल पाचचा मित्र. समोरच्या टेकडीमागे चंद्र लपलेला. त्यामुळे खालच्या पाणवठ्यावर गडद अंधार. फांदीच्या बेचक्यात अवघडलेले अंग. मिटू पाहणारे डोळे प्रयत्नपूर्वक रोखून खालच्या काळ्या अंधारात काही बघण्याची व्यर्थ खटपट. सभोवताली जंगलातील गूढ शांतता. आणि ती शांतता आणखीच स्तब्ध करणारी रातकिड्यांची किरकिर. उघड्या मचाणावर वाघीणीची वाट बघत नि:शस्त्र असे आम्ही दोघे.”*

I.T, मुंबईच्या आमच्या Wide Life Club ला राजस्थानच्या रणथंबोरहून ह्या अभयारण्यातील प्राणी मोजण्यासाठी येण्याचे निमंत्रण आले आणि आम्ही उड्याच मारल्या. पी.एच.डीच्या प्रबंधाचे लिखाण बाजूला ठेवले आणि दहाजणांच्या Team बरोबर जंगलात दाखल झालो. एका विस्तीर्ण जलाशयाकाठच्या तशाच सुंदर रेस्टहाऊसमध्ये आम्ही उतरलो होतो. आजूबाजूला अतिशय नयनरम्य निसर्ग, घराभोवताली जवळच नाचणारे मोर, झाडांवर सहजपणे दिसणारा स्वर्गीय नर्तक पक्षी आणि त्याची फूटभर लांबीची शेपटीची पिसे. ताडोबा,... सिक्कीमच्या जंगलात भटकल्यानंतरही व्याघ्र प्रकल्पातील या महत्त्वाच्या अभयारण्यात राहण्याचा अनुभव काही वेगळआच होता.


*“रात्रीचे ११ वाजले. हातापायाच्या मुंग्या घालविण्यासाठी हालचाली करत बिस्किटांचा पुडा फोडला. मित्राशी हळूच कुजबुजलो. ‘वाटेत येताना दिसलेली वाघीण आणि तिच्या दोन बछड्यांच्या जवळच थांबायला पाहिजे होतं. हा स्पॉट मस्त आहे, पण याला काही मचाण म्हणता येणार नाही. आणि खालच्या पाण्यावर कोणी जनावर फिरकायचंही लक्षण दिसत नाही.” मित्र पण कंटाळला होता. म्हणाला ‘त्या डेव्हिडलाही आपल्या बरोबर थांबवायला पाहिजे होतं. छान गप्पा तरी झाल्या असत्या’ कुजबुजताना आवाज जरा वाढल्याचे लक्षात येऊन दोघंही एकदम चूप झालो. तोंडात बिस्किट घोळवत खालच्या पाण्याच्या दिशेने बघत शांत बसलो.”*

हा डेव्हिड म्हणजे आफ्रिकेच्या सेरेंगटी पार्कमध्ये १०,००० हत्ती सांभाळणारी एक अफलातून व्यक्ती. त्याच्याशी दुपारीच भेट आणि गप्पा झाल्या. त्याचवेळी गेस्ट हाऊसच्या मागच्या बाजूला पाण्याजवळच्या झाडीत येऊन बसलेल्या पट्टेवाल्या वाघाचे प्रचंड थोबाड दुर्बिणीतून सगळ्यांनी निरखून पाहिले होते. वाघ मोजण्यासाठी दोन पद्धती एक प्रत्येक पाणवठ्यावर सकाळच्या वेळात जाऊन साच्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस वापरून (पगमार्क) पाऊलखुणा तयार करून घेणे.

प्रत्येक वाघाच्या पावलाचा ठसा वेगळा असतो. किंवा सर्व पाणवठ्यावर रात्री मचाणावर बसून पाणी प्यायला येणाऱ्या वाघांची मोजणी करणे. रात्रीतून एकदा वाघ पाण्यावर येतोच. पण अनेक पाणवठे त्या मे महिन्यातही रिकामे राहिले होते. म्हणून डेव्हिडच्या जीपमधून संध्याकाळी बाहेर पडलो.

*"पेंगणाऱ्या दोस्ताला हालवून जागे केले. उगीचच खिशातला फळे कापायचा चाकू चाचपून बघितला. अर्ध जागृतावस्थेत डोळ्यांपुढे संध्याकाळचे दृश्य उभे राहिले. डेव्हिडच्या जीपमधून येताना वाटेतच डावीकडे वाघिणीने शिकार केली होती. मधल्या रिकाम्या ओढ्याच्या पलिकडे टेकडीच्या उतारावर वाघीण निवांत बसली होती. शेजारीच सांबराचे पोर मरून पडले होते. वाघिणीचे २ बछडे त्या मृत सांबराच्या अंगाचे लचके तोडण्यात मग्न होते. झूममधून फोटो घेऊन आम्ही पुढे निघालो होतो. विचारांच्या तंद्रीत असतानाच सर्रकन अंगावर काटा उभा राहिला. मित्राचीही सावध हालचाल जाणवली. खाली पाण्याच्या दिशेने काही बारीक हालचाल जाणवत होती. डोळे ताणून अंधारात रोखले. मोठ्या कुत्र्याच्या आकाराचे काहीतरी पाण्याकडे येत होते. कोल्हा...रानमांजर...बिबट्या...रानडुक्कर? अस्वल नक्कीच नव्हते याचे मनाशी समाधान वाटले आणि त्याचक्षणी आमची केविलवाणी स्थिती आणि काहीसे बेफिकीर धाडस प्रत्यक्षात जाणवले."*

डेव्हिड बरोबर संध्याकाळी खालचा स्पॉट चांगलाच मनात भरला होता. छोट्या टेकडाच्या पायथ्याशी बऱ्यापैकी पाणवठा होता. शेजारीच १० फुटावर एक छान झाड. त्याच्यावर पहिल्याच बेचक्यात मचाण



बांधायचे ठरले. जीपमधली एकच फळी आणि काही फांद्या घेऊन अर्ध्या तासात मचाण बांधले. पानांचा आणि छोट्या फांद्यांचा आडोसा करण्याइतका वेळ नव्हता म्हणून मचाण उघडेच ठेवले. जमिनीपासून उंची फक्त १२ फूट. आम्ही झाडावरून चढून वर जाऊन बसलो. ताडोबाच्या २५ फुटी सुरक्षित मचाणाच्या मानाने आता thrill जास्त होतं. मागच्याच टेकडीवर वाघीण आणि दोन तगडे बछडे होते. डेव्हिडने जीप सुरू केली. वरूनच हात हालवून आम्ही निरोप दिला तेव्हा जंगलात हळूहळू अंधार दाटू लागला होता.

*''खाली पाणी पिण्याचा लपलप आवाज ऐकू आला. कमांडर टॉर्चवर हात घट्ट धरून बसलो. झोत टाकावा का? मित्राशी कुजबुजण्याचीही सोय नव्हती. खालचा तो आकार बिबट्या असेल तर आमची बारा फूट उंची म्हणजे त्याला एका झेपेचीही गरज नव्हती. मचाणाला आडोसा काहीच नव्हता आणि आमच्यापेक्षा जनावरच आम्हाला आधी बघण्याची जास्त शक्यता होती. मनात त्या स्थितीमध्येही एक विनोदी विचार चमकून गेला की अशा जागी आम्ही बंदूक घेऊनच बसणार असं त्या खालच्या प्राण्याच्या मनात येईल का? सगळी झोप कुठच्याकुठे पळालेली. सर्व संवेदना खालच्या पाण्याकडे रोखल्या असताना, अचानक तो पाणी पिणारा प्राणी अतिशय चपळतेने तिथून पलायन करता झाला आणि दुसराच एक उत्साही प्राणी पाण्याकडे धावत आला. आणि ...... त्याचवेळी गर्भगळीत करणारी एक प्रचंड डरकाळी पाण्याशेजारच्याच जाळीतून ऐकू आली. आमची हालचाल काय श्वाससुद्धा बंद पडला होता.*

*आधीच्या प्राण्याला घाबरवून स्वत: पाणी प्यायला आलेला तो वाघीणीचा बछडा आईच्या डरकाळीनिशी थबकला आणि संथपणे जाळीत निघून गेला. पाण्याशेजारच्या जाळीत दोन्ही बछड्यांसह बसून वाघीण गुरगुर करीत होती. झाडावर माणूस बसला असताना पाण्यावर गेल्यावर बछड्याला रागवीत असावी. सर्कस किंवा पेशवे पार्कमधील वाघाची ती कण्हण्यासारखी गुरगुर आधी ऐकली होती. पण आता तसे आम्ही समोरासमोर होतो. त्यातल्यात्यात समाधान की वाघीणीची शिकार आणि खाणं संध्याकाळीच झालं होतं आणि आम्ही फक्त तिची तहान भागवण्याच्या आड आलो होतो. काही काळाने गुरगुर थांबली. (आमचीही थरथर थांबली) चंद्र टेकडीमागून वर येतायेता बछड्यांना घेऊन वाघीण मागच्या टेकडीहून निघून गेली.''*

पहाट झाली. रात्रीचा भयाण पाणवठा परत प्रकाशात रम्य भासू लागला. एक चितळ पाणी प्यायला यायच्या विचारात होते. झाडावर आम्हाला बघून विचार बदलून पळून गेले. चितळ जवळ यायला धजले याचा अर्थ धोका नसावा. या विचाराने आम्हीही खाली उतरलो. अंग मोकळे केले. पाणी प्यालो. अन् डेव्हिडच्या जीपची वाट बघत बसलो.

● ●

**एकांकिका**

# ❖ मानवतेचे पाईक आम्ही

❖ **– सौ. सुचेता भालेराव**

**निवेदक :** 'आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य–प्रवर्तक! समाजातील शूद्र–अतिशूद्रांच्या व्यथा ज्यांनी नि:शंकपणे बोलून दाखविल्या. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे अज्ञान व दारिद्र्य हे ईश्वर निर्मित नसून त्यांचे मूळ आपल्या समाज व्यवस्थेतच आहे. हे ज्यांनी बरोबर ओळखले, रूढी प्रामाण्य आणि सामाजिक विषमता यांना दैवी अधिष्ठान मिळवून देणाऱ्या तथाकथित धर्मसंस्थेविरुद्ध ज्यांनी हत्यार उपसले, प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिक मानवी हक्क प्राप्त करून देण्यासाठी जे जन्मभर झगडले – त्या त्रिमूर्तीला ज्योतिबा, आगरकर, आंबेडकरांना आपण आपले श्रद्धासुमन अर्पण करूया.

**– पोवाडा –**

समतेचे ते रखवाले। हो धन्य ज्योतिबा झाले
सत्याचे पालनवाले। ते धन्य आगरकर झाले
पतितांचे पालनवाले। ते धन्य भीमजी झाले
जागवुनि महाराष्ट्र गेले। ते धन्य महात्मे झाले।।
जन्माचे 'मालाकार'। कर्माची खडी तलवार
स्त्री दास्य विमोचन केले। ज्योतिबा अमर हो झाले।। *ते धन्य ज्योतिबा झाले*
सरस्वती पोटी जन्मले। बुद्धिवादी आगरकर झाले।
सत्याचे झेंडे रोविले। समाजास त्यांनी उद्धरले।। *ते धन्य आगरकर झाले*
चौदावे रत्न जन्मले। भीमेला धन्य त्याने केले।
'बुद्ध–धम्म' भीमरावे रचियले। दलितांचे कैवारी झाले।। ते धन्य भीमजी झाले

**निवेदक :** सामाजिक विषमतेमुळे शूद्र–अतिशूद्रांचे स्त्रियांनाही आपल्या नैसर्गिक मानवी अधिकारांना मुकावे लागले होते. ज्योतिबांना ही विषमता सहन झाली नाही. त्यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. सामाजिक जीवनाचा आरंभ त्यांनी स्त्री समस्यांचा मागोवा घेत केला. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला प्रत्येक बाबतीत दुय्यम स्थान देण्यात आले होते. पिता, पती व पुत्र यांच्या आज्ञेने तिला सदैव राहावे लागत असे. पिता, पती व पुत्र यांच्या आज्ञेने तिला सदैव राहावे लागत असे. अशा वेळी सावित्रीबाईंसारख्या सहचारिणीपासूनच जोतिबांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. प्रथम ज्योतिबांनी स्त्रीचे खरे स्थान सावित्रीबाईंना दिले. स्त्री ही अधिक सहनशील, त्यागी, प्रेमळ, कर्तव्यदक्ष, परहितपरायण कशी असते हे सावित्रीबाईंच्या स्वरूपात त्यांनी जगाला दाखवून दिले.

(दृश्य : ज्योतिबांच्या घरातील बैठकीची खोली. सतरंजी पसरलेली. कोपऱ्यांत लेखन साहित्य. छोटे टेबल, दौत, टाक इत्यादी.)

दरवाज्यावर टकटक. सावित्रीबाई लगबगीने येऊन दरवाजा उघडतात. उपरण्यानी घाम पुसत ज्योतिबा प्रवेश करतात. कोपऱ्यात चपला काढतात. सावित्रीबाई त्यांच्याकडून हातातली पिशवी घेतात. ज्योतिबा पगडी खुंटीवर लावता लावता स्वत:शीच बडबडत असतात.

**ज्योतिबा :** जे घडावेसे वाटतेय ते अजून घडत नाही. माझ्या मनाला जे वाटते, जाणवते ते सगळ्यांना सांगत सुटलोय खरा पण ज्यांच्यासाठी हे सर्व करतोय ते त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही. आणि म्हणून जे घडायला पाहिजे ते घडतच नाही.

**सावित्री :** म्हटलं कसल्या विचारांत आहात? काय घडावं वाटत होतं आणि घडलं नाही?

**ज्योतिबा :** काय सांगू, माझ्याबरोबर काम करायला कोणीही पुढे येत नाही. नात्यातल्या माणसांनी सुद्धा माझ्या विरुद्ध वागायला सुरुवात केली आहे. मी एकटा वेड्यासारखा गावोगावी हिंडून भाषण देतोय, लोकांना जागं करायला बघतोय. पण माझी एकट्याची धडपड वाया जाईल असे वाटतेय. लोकांना एकत्र आणण्याचे काम फाटक्या झोळीत टाकलेल्या दानाप्रमाणे वाया जाणार असे दिसते आहे.

**सावित्री :** (विचार करून) खरंच, त्यासाठी तुम्हाला आधी झोळी भक्कम करायच्या कामाला लागलं पाहिजे. खरं आहे ना?

**ज्योतिबा :** मला वाटतं आतापर्यंत मी खूप धडपड केली. वाऱ्यासारखा वणवण फिरलो पण त्याचा म्हणावा तसा उपयोग झाला नाही. मला आता माझी बडबड लिहून काढावी आणि लोकांच्या डोक्यात, मनांत, तोंडात घोळवावी अशी इच्छा होऊ लागली आहे.

**सावित्री :** चांगली गोष्ट आहे.

**ज्योतिबा :** शिवाजी महाराजांवर पोवाडा लिहून माझ्या लेखनाला प्रारंभ करायचा विचार आहे.

**सावित्री :** ते तुम्हाला कसं जमणार? शिवाजी महाराज तर गोब्राह्मण प्रतिपालक होते. त्यांचा पोवाडा तुम्ही कसा लिहिणार! तुम्ही तर ब्राह्मणांविरुद्ध बंड उभारले आहे ना? पण-- सगळेच ब्राह्मण काही तसे नाहीत हं.

**ज्योतिबा :** खरं आहे सावित्री, पण शिवाजी राजा हा फक्त ब्राह्मण-क्षत्रियांचा नव्हता, तो स्त्री, क्षुद्र, अतिशूद्रांचाही होता. राजांचे खरे कार्य अजून कोणी सांगितलेलेच नाही. 'लंगोट्यास देई जानवी, पोशिंदा कुणब्यांचा, काळ तो असे यवनांचा' हे शिवाजी राजांचे खरे बिरुद आहे. शिवाजी राजांनी आपल्या राज्यात स्त्रीला खरंखुरं अभयदान दिलं. सर्वांचे प्रतिपालक होते

ते. आपल्या वडिलांच्या दासीपुत्रालाही त्यांनी सख्ख्या भावाप्रमाणे मानलं. शिवाजी राजांनी आपल्या आईच्या प्रेरणेने आणि एकनिष्ठ, निर्भय, शौर्यशाली सहकाऱ्यांच्या साहाय्याने 'रोविला झेंडा हिंदूचा' हेच या पोवाड्यात मी सांगणार आहे. आणि नंतर 'ब्राह्मणांचे कसब' लोकांना तोंडपाठ होईल अशा साध्या शब्दात लिहिणार आहे.

**सावित्री :** शेटजी, एक म्हणता दोन पोवाडे लिहिणार की – म्हणजे वणवण भटकणं सोडून घरात बूड टेकून बसावं लागणार.

**ज्योतिबा :** हो. हो. निश्चितच 'शिवरायांचे कर्तृत्व' आणि 'ब्राह्मणांचे कसब' पूर्ण करेपर्यंत घर घर आणि घर.

(ज्योतिबा लिहायला बसतात. सावित्रीबाई आत निघून जातात.)

पुन्हा सावित्री प्रवेश.

**सावित्री :** शेटजी, असे किती दिवस लिहित बसणार. लोक आता म्हणायला लागलेत ज्योतिबाला नुसती कवनंच लिहायला जमतात.

**ज्योतिबा :** जमतात म्हणतात ना, मग हरकत नाही.

**सावित्री :** पण मला एक खात्री वाटत नाही. ती कवनं ज्यांच्यासाठी लिहिता ते ती ओठांवर घोळवतील परंतु मनावर रूळवतील का? कारण पाप-पुण्यांच्या भाकड कथांनी भरलेल्या वाळवीच्या वारूळात सापडल्यासारखी शूद्र-अतिशूद्रांची स्थिती झालेली आहे. त्यांनी ही तुमची कवनं कशी वाचवणार?

**ज्योतिबा :** (गंभीरपणे) नुसते शूद्र-अतिशूद्रच त्या वाळवीने भरलेल्या वारूळात सापडलेले नाहीत तर त्यात स्त्रियाही आहेत. सगळ्याच स्त्रिया आहेत. ब्राह्मणांच्या घरातल्या सुद्धा. स्त्रियांनीच खरी ही वारूळं फोडून काढायला कंबर कसली पाहिजे. माझा लढा हा ब्राह्मणांनी एकाच दावणीला बांधलेल्या शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांसाठी आहे. आपल्याच पुरुषांचे हे पाप-पुण्याचे कुभांड हे या स्त्रियाच फोडतील.

**सावित्री :** शेटजी, तुम्ही फोडतील करतील असे म्हणता म्हणजे उद्याची गोष्ट सांगता आहात. पण आजचे काय? आज ब्राह्मणांच्या घरात केशवपन करून स्त्रियांच्या जीवनात जो अंधार आहे त्याचे काय?

**ज्योतिबा :** त्या दुर्दैवी स्त्रियांसाठी आपण काय करणार?

**सावित्री :** आपण करणार नाही तर मग कोण करणार? आपल्या मधलेच न्हावी चार, दोन आण्यांसाठी हे पाप करतात.

(इतक्यांत दरवाजावर टकटक – सावित्रीबाई दरवाजा उघडतात.
नामदेव न्हावी आत येतो) (आल्या आल्या आपल्याच नादात

हातवारे करीत बडबड चालू ठेवतो.)

**नामदेव न्हावी :** ज्योतिराव नमस्कार (ज्योतिबा काही बोलण्याच्या आत) अवं काय सांगू तुमास्नी, गरीबांनी घर बांधायचं न्हाई, बांधलंच तर वास्तुशांत करायची न्हाई आणि केलीच तर बामणाला बोलवायचा न्हाई, आणि जर का त्याला बोलिवलंत आणि भट आलाच तर तो येनारा बिचारा भट बी पोरका आनि आमी बी पोरके. आता माजं डोस्क लई घुमाया लागलं बघा. आता मी दावतो इंगा एकेकास्नी. मला वाळीत टाकता काय ! मग वाढवा म्हणावं केस आणि घाला येन्या. आता मातर पकु बघा - ह्या दुष्टांच्या घराला लहान बापड्या पोरींचे केस कापाया मी कधी जानार म्हनून न्हाई.

**सावित्री :** वा वा ! शाब्बास नामदेवा. रागाच्या भरात एक चांगलं पुण्यकर्म करायला निघालास की.

**ज्योतिबा :** खरंच सावित्री, नामदेवासारखं आपल्या सर्वच बांधवांनी हे पुण्यकर्म स्वीकारले तर आपली फाटकी झोळी धडशी आणि दणकट झालीच म्हणून समज.

(बाहेर बरीच गडबड ऐकायला येते.)

**नामदेव :** ज्योतिराव, रागाच्या भरात सांगायचं राहून गेलं बघा. भाईर समदी भावबंद माझ्या नावानं आरडा-वरडा करीत माज्या पाटनं आलीत बघा. म्हनत्यात तू बामनाचं काम सोडलंस तर ते आमाला बी बुलिवनार न्हाईत आणि तुझ्या संगं तू आमाला बी उपाशी पोटी मारणार हाईस. आता तुमीच समद्यांची समजूत घाला बघा.

**ज्योतिबा :** (दाराजवळ जाऊन) यारे सगळ्यांनी आत या. (पाच सहा जण गडबडीने आत येतात. ज्योतिबांना नमस्कार करतात.) - सगळेजण एकदम काहीतरी सांगायला बघतात. मग एक व्यक्ती धीर धरून बोलतो.

'हा नाम्या सोता उपाशी मरनार आनि आमाला बी मारनार. आता ज्योतीराव हात जोडतो. तुमीच न्याय द्या आमास्नी.'

**ज्योतिबा :** (समजावणीच्या स्वरात) अरे, जरा शांत व्हा. तुमची अडचण मला समजली आहे. आता मी काय सांगतो ते शांतपणे ऐका आणि मग सांगा नाम्या चुकला की तुम्ही सर्वजण चुकत आहात. - बसा बघू सर्वांनी खाली. (सर्वजण खाली बसतात.) मला एक सांगा तुम्ही लहान लहान पोरींचे केस कापायला जाता. (सर्वजण 'व्हय' म्हणत माना डोलवतात) पण ते काम - ते अजाण पोरींचे केस कापण्याचे काम! का कापतात हे विचारण्याचे धाडस तुमच्यापैकी एकाने तरी अजूनपर्यंत केले आहे का? आपण हे काम का करतो याचा तुम्ही कधी स्वत:शी विचार केला आहे का? नवरा मेल्याच्या दु:खाने अर्धमेल्या झालेल्या मुलीचे केस कापून तिला तुम्ही विद्रूप करता, तिच्या दु:खात अजून भर घालता,

तिला जगणं नकोसं करून टाकता. त्या घरातल्या माणसांचा त्या पोरीवर विश्वास नसतो. धर्माच्या नावाखाली पाप-पुण्याचे खोटे खेळ ही मंडळी सतत खेळत असतात. आणि चार आण्याच्या कमाईसाठी तुम्ही त्या खेळात सामील होता. त्या गरीब मुलींचे शिव्याशाप घेता. कशाला करता हे पाप?

(ज्योतिबांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणाऱ्यांपैकी एक बोलू लागतो - बोलताना उभा राहतो. हळू हळू सगळे उभे राहतात.)

'खरं हाय तात्या, पोटापाई आमी ह्यो वंगाळ काम करतो. त्या पोरी रडू वरडू लागल्या की आमच्या पोरींची तोंडं डोळ्यापुढे येत्यात आणि जीवात समदी कालवाकालव होऊनशानी जाते बघा.'

**जनाजी :** (एक वयस्कर न्हावी) अरे, पन आपल्यास्नी बी पोरबाळं-घरदार हाईच की, कुनाच्या बी कातड्याचं आसलं तरी आवाज काढाया ढोलकं बडवाया लागतंच की.

**ज्योतिबा :** (जनाजीच्या खांद्यावर हात ठेऊन) जनाजीबाबा, तसं न्हाई ते. तुम्ही ढोलकं काय नुसतं आवाजासाठी बडवता? (सर्वांच्या चेहऱ्यावर आश्चर्य. मान हालवतात.) नाही ना. गाण्याला ताल येण्यासाठी तुम्ही ढोलकं वाजवता. मग आपले जगणे चांगले होण्यासाठी आपण काय करायला पाहिजे याचा विचार करायला नको का? (सर्वजण होकारार्थी मान हालवतात) पोरी बाळींना विद्रूप करून का तुमचं जगणं चांगलं होणार आहे ! वंगाळ काम ते वंगाळच. ते आपणच का करायचं?

क्षणभर सर्व शांत

**जनाजी :** खरं आहे ज्योतिराव, खरं हाय तुमचं म्हननं. आपन कशापाई पापाचं वाटकरी व्हयाचं !

**ज्योतिबा :** आणि हे बघा, भट-बामन स्वत:चे केस किती दिवस वाढवतील? शेवटी कापायला तुमच्याचकडे येतील. तेव्हा पोटाचाही प्रश्न राहणार नाही.

(सर्वजण माना डोलावतात. सावित्रीबाई आनंदानं डोळ्याला पदर लावतात. सर्वजण जोतीरावाला नमस्कार करून 'ज्योतिराव की जय' करीत निघून जातात. सावित्रीबाई ज्योतिबांचे पाय धरतात.)

**ज्योतिबा :** सावित्री, उठ बघू. तुला कितीवेळा सांगितलं की मी माणूस आहे. आणि माणसाच्या पायावर डोके ठेवणे मला आवडत नाही.

**सावित्री :** (उठत) नुसते माणूस नाही - देवमाणूस आहात तुम्ही.

●●●

# आम्हीच लिहिणार आमचे पान!

## ● माझी श्रीनगरची सहल ..... १९९१ ●

सकाळची वेळ ! वृत्तपत्राचं पान उघडावं तर पहिल्या पानावरील ठळक बातम्या 'श्रीनगर मधील हाजरतबाल मशिदीचा अतिरेक्यांनी घेतलेला ताबा - त्यासंबंधी चाललेल्या वाटाघाटी' माझ्या डोळ्यांसमोर १९९१ साली पाहिलेले निसर्गसौंदर्याने नटलेले पण अशांततेचे धुसर धुके पसरलेले श्रीनगर !

माझे काका सैन्यात असल्यामुळे त्यांची श्रीनगरला बदली झाल्यावर आम्ही श्रीनगरला जाण्याचा बेत केला. श्रीनगरच्या विमानतळावरील गुलाबी थंडी आणि विमानतळाभोवतीचे बंदुकधारी जवान यांनी माझे लक्ष वेधून घेतले व मला येथील अशांत परिस्थितीची कल्पना आली.

सूर्यप्रकाशात चमकणारी बर्फाच्छादित हिमशिखरे, ऊनपावसाचा खेळ, रंगीबेरंगी फुले मन मोहवून टाकत होती. कडक बंदोबस्त असूनही आम्ही दल सरोवर व चष्मेशाही बाग पाहायचे ठरवले. सर्वत्र शुकशुकाट होता. सुंदर आकार दिलेली झाडे, विविध फुले यामुळे चांगली व्यवस्था नसूनही बाग खूप सुंदर दिसत होती. हाजरतबाल मशिदीचा कोरीव नक्षीकाम केलेला घुमट तेथून अतिशय सुंदर दिसत होता. काश्मिरवर निसर्गाने केलेली सौंदर्याची उधळण पाहून हे भारताचे नंदनवन आहे हे जाणवत होते.

बागेतून बाहेर आल्यावर माझी आई बी.एस.एफ.च्या जवानांना म्हणाली 'परेश्वर तुमचे रक्षण करो!' खरंच हे जवान रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून काश्मिरचे रक्षण करीत असतात. त्यांच्यातला एखादा देशासाठी करीत असतात. त्यांच्यातला एखादा देशासाठी प्राणालाही मुकतो याची आपल्याला कल्पनाही नसते. पण त्यांच्याकडे पहात असताना ते आपल्या कर्तृत्वाने एक जाणीव अवश्य करून देतात. 'भारत देश अखंड आहे. काश्मिर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. जो कुणी भारताचे विभाजन करू इच्छित असेल त्याला आम्ही चांगला धडा शिकवू.'

**कु. मानसी खळदकर,** इ. ९ वी
अरणेश्वर विद्यामंदीर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को | ह | र | ण | ना | री | त | इ | टि | या | डो | ह | डा |
| हे | य | ळ | वा | क | शे | भं | रा | धा | न | ग | री | ये |
| पिं | र | ना | द | न | रा | भं | पिं | प | ळ | चा | ना | ल |
| प | मा | गा | पा | वा | जो | डा | गं | ग | चा | स | थ | द |
| ळ | णि | प | व | उ | वी | र | गा | धो | म | क | सा | री |
| गा | क | व | र | ज | र | द | पू | स | क | मा | ग | मा |
| व | डो | ना | स | नी | भा | रा | र | न | ला | न | र | ये |
| जो | ह | ल | गा | द | ट | री | सू | स | र्या | को | प | र |
| गा | य | क | व | ना | घ | मा | वा | णि | क | आं | ध | ळी |
| व | हा | डो | रं | ह | र | क | क | तो | त | ला | डो | ह |
| ट | ळ | त | क | ज | ड | रं | ज | व | ण | घ | र | सू |
| ज | नी | वं | नू | ख | व | क | का | टे | पू | र | णा | र्या |
| भा | ट | घ | ड | र | टे | ण | पू | क | णे | र | र | णा |

वरील चौकटीतील अक्षरांमध्ये २७ धरणांची नावे लपलेली आहेत. ती शोधून काढा.

**- मंदार गोडबोले, ९ वी, ज्ञा. प्र. प्र.**

# ● शब्दरूप आले मुक्या वेदनेला ●

**– शैलजा देशमुख**

स्वातंत्र्योत्तर काळातही आर्थिक आणि सामाजिक जीवनात असलेल्या विषमतेमुळे प्रत्येक माणसाला सारखी किंमत नाकारली जाते. या विषमतेचे बळी ठरलेल्या दलित कवींच्या वेदना जेव्हा शब्दरूप घेतात तेव्हा अंत:करण हेलावणारी कविता जन्म घेते. कवयित्री हिरा बनसोडे यांची 'सखी' ही कविता अशीच एक साधासुधा प्रसंग वर्णन करणारी पण खूप आशयसंपन्न असणारी!

एक उच्चवर्णीय मैत्रीण आपल्याकडे जेवायला येणार म्हणून कवितेतील 'ती' आनंदी होते. मोठ्या उत्साहाने पान सजवते. मैत्रीण पानावर बसते अन् नाक मुरडते. ''हे काय, चटणी, कोशिंबिर, भाजी कुठे वाढतात एवढंही तुला ठाऊक नाही?'' ती थोडी शरमते. नंतर शेवटी भातावर दहीताक नाही म्हणून मैत्रीण वैतागते. आतामात्र तिचं दु:ख शब्दांत बाहेर पडतं. दारिद्र्यात घालवलेलं बालपण तिला आठवतं. रोज पोट भरायची पंचाईत तर कुठले समजणार रीतिरिवाज?

किती बोलकी आहे ही व्यथा! सामाजिक विषमतेइतकीच 'तिची पाळंमुळं आर्थिक विषमतेत आहेत. आपल्याच चालीरिती सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या प्रवृत्तीचे वास्तवदर्शन येथे घडते. तर एकीकडे पराकोटीचे दैन्य, दारिद्र्य असताना संकेताची चूक घडली तर दोष कुणाला द्यावा हा कवयित्रीचा सवाल अंतर्मुख करणारा आहे –

## ● सखी ●

**कवयित्री – हिरा बनसोडे**

*आज प्रथमच तू माझ्याकडे जेवायला आलीस,*
*नुसतीच आली नाहीस तर तुझी जात विसरून आलीस.*
*सहसा बायका परंपरेची विषमता विसरत नाहीत.*
*परंतु तू आभाळाचे मन घेऊन आलीस.*
*माझ्या वीतभर झोपडीत,*
*वाटलं, जातीयतेचा तू कंठच छेदला आहेस,*
*माणसाला दुभंगणाऱ्या दऱ्या तू जोडीत आली आहेस.*
*खरंच सखे, फार फार आनंदले मी,*
*शबरीच्या भोळ्या भक्तीनेच मी तुझं ताट सजविलं*
*किती धन्य वाटलं मला!*
*पण. . .पण ताट बघताच तुझा चेहरा वेडावाकडा झाला,*
*कुत्सित हसून तू म्हणालीस,*

*''इश्श! चटण्या, कोशिंबिरी अशा वाढतात का?*
*अजून पान वाढायलाही तुला येत नाही*
*खरंच, तुमची जात कधीच सुधारणार नाही!''*
*माझा जीव शरमून गेला. .*
*मघाशी आभाळाला टेकलेले माझे हात*
*चटकन कुणीतरी छाटल्यासारखे वाटले,*
*मी गप्प झाले.*
*जेवण संपता संपता तू मला पुन्हा विचारलेस,*
*''हे गं काय? मागच्या भातावर दही, ताक काहीच कसं नाही?*
*बाई गं, त्याशिवाय आमचं नाही हो चालत. . .?''*
*तुटलेल्या उल्केसारखं मन खिन्न झालं, सुन्न झालं पण . .*
*दुसऱ्याच क्षणी मन पुन्हा उसळून आलं*
*पाण्यात दगड मारल्यावर जसा तळाचा गाळ वर येतो,*
*तसं सारं पूर्वायुष्य हिंदकळून समोर आलं,*
*सखे, दहीताकाचं विचारतेस मला!*
*. . . कसं गं सांगू तुला?*
*अगं, लहानपणी आम्हाला चहालासुद्धा दूध मिळत नव्हतं,*
*तिथं कुठलं दही आणि कुठलं ताक?*
*लाकडाच्या वखारीतून आणलेल्या टोपलीभर भुशावर*
*माझी आई डोळ्यांतला धूर सारीत स्वैपाक करायची.*
*मक्याच्या भाकरीवर लसणीची चटणी असायची कधीमधी,*
*नाहीतर भाकरी कालवणाच्या पाण्यात चुरून खायचो आम्ही,*
*सखी, श्रीखंड हा शब्द आमच्या डिक्शनरीत नव्हता तेव्हा,*
*लोणकढी तुपाचा सुगंध घेतला नव्हता माझ्या नाकाने,*
*हलवा बासुंदी चाखली नव्हती कधी या जिभेने,*
*सखी, तुझी परंपरा तू सोडली नाहीस*
*तर तिची घट्ट मुळे तुझ्या मनात रुजलेलीच आहेत*
*हेच त्रिवार सत्य आहे.*
*मैत्रिणी, मागच्या भातावर दही नाही*
*म्हणून रागावू नकोस गं. . .!*
*तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थांचा क्रम चुकला*
*यात माझा काय दोष हे मला सांगशील का?*
*माझा काय दोष हे मला सांगशील का?*

# बनी शाळेला जाते !

– सौ. रजनी वैद्य, लातूर

(छोटी गडबडी, धांदरट मुलगी डोळे चोळत झोपण्याच्या मूडमध्ये)

आई! ए आई! मला सकाळी ५ ला उठव बरं का! खूप गृहपाठ करायचा पडलाय! विसरू नकोस बरं का!

काय म्हणतेस? ५ वाजले? ए, प्लीज, ५ मिनिटंच झोपते गं! पहाटे इतकी मस्त झोप लागते तर तुझा भुंगा सुरूच! काय म्हणालीस? होम वर्क? खरंच ग विसरलेच होते मी. (गडबडीने उठत)

हे काय गं आई लवकर का उठवलं नाहीस? आता कसं आवरणार माझं? ए आई, लवकर दूध दे ना!

दादा, माझा कंपास रे? काल तर तू घेतला होतास. आणि हे काय पेन्सिलीचं टोकही मोडून ठेवलंयस ! तुझ्या वस्तूंना मात्र हात लावू देत नाहीस. आधीच इथे उशीर झालाय. कसा होणार माझा भूमितीचा अभ्यास? अे, एवढं गणित समजावून सांग ना! काय म्हणतोस? अेवढं सोप्पं गणित कसं येत नाही? सगळे असंच म्हणतात – नाही कळलं आम्हाला वर्गात – समजावून घेण्याइतका वेळ तरी कुठे असतो? बाई आपल्या जातायत पुढे पुढे ! पोर्शन संपवायची घाई ना ! आमचे हाल कुणाला कळतायत !

हां, आता मराठीचा गृहपाठ ! काय तर म्हणे निबंध लिहा 'चांदण्या रात्रीची सहल' आधी चांदण्या रात्री सहल तरी न्या ना ! किती कल्पनेला ताण द्यायचा हो ! इथे शहरात दिव्यांच्या झगमगाटात चांदणं तरी दिसतं का कधी? जाऊ दे – बघू या तरी निबंधाच्या पुस्तकात हा विषय मिळतोय का?

बापरे, ९ वाजत आले, कधी संपायचा हा गृहपाठ ! अे ताई, पाहा ना जरा माझी इतिहासाची वही मिळतेय का, अगं किती शोधली. एवढा भाव नको खाऊस. मी नाही का तुझी कामं करत? आम्ही लहान म्हणून आम्हाला मात्र सर्वजणं कामं सांगणार! आणि आम्हाला मात्र कुण्णी कुण्णी मदत करत नाही घाईच्या वेळी !

अे आई, लवकर पान वाढ ना ग! हे काय? आज परत मुळ्याची भाजी? 'पालेभाज्या खाव्यात' माहीतीये गं मला! तू कशाला सांगायला हवंस ! शास्त्राच्या पुस्तकात आहे की ते – आणि डब्यात काय दिलंयस? पोळी–भाजीच? छानसं काहीतरी दे ना !

आई गं. माझ्या युनिफॉर्मचा पट्टा कुठाय? काय म्हणतेस – असेल कपाटात. कसा गं शोधायचा त्या कपड्यांच्या ढिगात? आज काही खरं नाही माझं ! एक वस्तू धड मिळेल तर शपथ ! देवा रे देवा हे काय आज सायकलही पंक्चर ! बाबा, मला जरा सोडा ना स्कूटरवर ! काय म्हणता, तुम्हाला म्हणता, तुम्हाला महत्त्वाच्या कामासाठी लवकर जायचंय? मग आता काही

शाळेत शिक्षा चुकत नाही. अे आई, माझं डोकं दुखतंय – नाहीच जात मी आज शाळेत – काय म्हणतेस ढोंग करतेय म्हणून?

हां आता ते थोडं खरंच आहे म्हणा! जाऊ दे आणि दिवसभर घरात बसा, उन्हात जाऊ नका. बुडालेला अभ्यास भरून काढा. त्यापेक्षा जावंच कसं शाळेत! उशीराबद्दल होईल थोडी शिक्षा ! पण मधल्या सुट्टीत लवकर डबा खाऊन कालचा अर्धवट राहिलेला खेळाचा डाव पुरा करायचाय! झालंच तर इंग्रजीच्या बाईंनी आज गोष्ट सांगायचं कबूल केलंय. आणि उगीच आई–आजीच्या पहाऱ्यात दिवस घालवण्यापेक्षा शाळेत जावं हेच बरं !

अे आई, जाते गं, काय म्हणतेस? सांभाळून जा म्हणून? आता मी लहान का आहे? रोज तेच तेच काय गं ! पण असू दे बाई, तुला अशी खिडकीतून निरोप देताना पाह्यलं ना की संध्याकाळी घरी केव्हा येतेयसं होऊन जातं ! अच्छा जाते गं! उशीर झाला तर काळजी करू नकोस बरं का ! ●●

---

## चिवडा .....

खाद्यांचे देखील एक खानदान असते. चिवडा हा पदार्थ भानगड गल्लीतला ! पण चिवड्यात अठरापगड गोष्टी असून त्याच्याभोवती मित्रमंडळांच्या अड्ड्याचे कुंपण आहे. मात्र चिवडा एकट्याने खाण्याचा पदार्थ नव्हे. चिवड्याची चव खाणाऱ्याच्या संख्येने गुणले असता वाढते ! पण चिवड्यातला अत्यंत चविष्ट भाग तळाशी उरलेले तिखट मीठ इतरांची नजर चुकवून तर्जनीने चेपून तो जिभेवर दाबल्यावर कळतो. ह्याला धैर्य लागते ! चिवड्यात सालांसकट शेंगदाणे टाकल्यावर पिवळ्या चिवड्यात जी दाण्यांच्या लाल सालीची आणि किंचित तळून पोपटी केलेल्या मिरचीची रंगसंगती जमते ती काही वेगळीच ! चिवडा खरा म्हणजे कोल्हापूरच्या छत्रे यांचा ! महाराष्ट्रात तर तीन छत्र्यांचे अनंत उपकार आहेत. एक चिवडेवाले, दुसरे सर्कसवाले आणि तिसरे केरूनाना गणिती ! उपकार उतरत्या श्रेणीने घ्यावेत. कारण चिवडेवाल्या छत्र्यांनी महाराष्ट्राच्या जिभेला झणझणीत साथ दिली. सर्कसवाल्या छत्र्यांनी वाघसिंहांना सांभाळले यापेक्षा रहिमखाँसारख्या भूगंधर्वाला पाळले हे त्यांचे खरे उपकार. शेवटचे गणिती असल्यामुळे त्यांना माझा केवळ अज्ञानापोटी आलेला नम्र प्रणाम !

मित्रांनो दिवाळीत घरोघरी चिवड्याची चव चाखलीत ना? त्याचे नाना रंग, रूपं, चवी ! पण जातीचा विनोदी लेखक चिवड्याचे रसग्रहण कसे करतो ते वर वाचलेत ना ? ओळखलंत का लेखन कोणाचे ते?

सर्व आबालवृद्धांचे लाडके लेखक श्री. पु. लं. देशपांडे यांचे ! नुकत्याच साजऱ्या झालेल्या त्यांच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रबोधनच्या वाचकांतर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !

## ● निबंध लेखनात सुधारणा कशा कराव्यात ! ●

– डॉ. सौ. नलिनी गुजराथी

***स्वत: लेखिका १९६७ साली ११ वी बोर्डात तिसऱ्या आल्या होत्या. मराठीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात सर्वप्रथम येऊन त्यांनी दोन सुवर्णपदकेही मिळविली. नंतर एम.एस्सी. करूनही भाषेवरील त्यांचे प्रभुत्व अन् त्यातील प्रतिभा अजूनही टिकवून ठेवली आहे. 'शास्त्रातील प्रतिभा' विकसित कशी करता येईल या संबंधी एक प्रबंध लिहून त्यांनी पीएच.डी. संपादन केली आहे. निबंध लेखनाचे तंत्र ज्यांनी स्वत: घोटवले त्यांनी स्वानुभवातून लिहिलेला हा लेख आपणा सर्वांना नक्कीच खूप उपयोगी होईल.***

शीर्षक वाचून तुमच्या हे ध्यानात आलं का की या लेखाचं शीर्षक नेहमीसारखं 'निबंधलेखन कसे करावे' हे दिलेलं नाही. असं वेगळं शीर्षक देण्यात अर्थातच माझा काही हेतू आहे. 'निबंधलेखन कसे करावे' अशा शीर्षकाचे लेख आतापर्यंत अनेकांनी लिहिले आहेत. वेगवेगळ्या गाईड्स–मार्गदर्शिकांमधून – दहावी विषयक अंकांमधून तुम्ही ते वाचलेही असतील. निबंधाच्या बहुतेक सर्व अंगांचा समग्र विचारही त्यातून तुमच्यापुढे मांडलेला असतो. आदर्श निबंधामध्ये काय काय हवे याची जंत्रीही त्यात दिलेली असते. इतकंच काय बोर्डात पहिल्या आलेल्या विनया हातवळणेचे 'अक्षरशिल्प'सारखे निबंधसंग्रहही प्रसिद्ध झाले आहेत. त्यात आदर्श, उत्कृष्ट, सुंदर निबंध वाचायला मिळतात. असे असूनही अनेक विद्यार्थ्यांना निबंधलेखन म्हणजे मोठे संकट वाटते. एखादा उंच डोंगर चढताना दमछाक व्हावी तशी त्यांची स्थिती होते आणि त्यांना वाटतं नको रे बाबा या वाटेनं जायला!' आदर्श म्हणजे काय हे समजले तरी त्या आदर्शाप्रत पोहोचायचे कसे याची वाट त्यांना सापडत नाही. ती वाट धुंडाळण्याचा एक प्रयत्न या लेखात केला आहे.

तुम्ही जर ८वीत, ९वीत असाल तर जरा आपल्या निबंधाच्या वहीची पाने उलगडून प्रत्येक निबंधाला आपल्या शिक्षकांनी किती गुण दिले ते पहा. काय दिसले तुम्हाला? पहिल्या निबंधाला जर १० पैकी ४ गुण दिले असतील तर दहाव्या निबंधालाही ४ च गुण फार फार तर ५ गुण दिलेले आढळतील. म्हणजे आपली जर ४ गुण मिळविण्याची लायकी असेल तर वर्षाअखेरीसही आपली तीच लायकी राहिली आहे. त्यात काही बदल, सुधारणा झालेली दिसत नाही. आपले गुण वाढतील कसे याचा विचार आपण करीत नाही. अर्थात एवढा परीक्षार्थी दृष्टिकोनही पुरेसा नाही. त्याच्या पलिकडे जाऊन आपला निबंध सुंदर कसा होईल, परिपूर्ण कसा होईल असा उत्तमतेचा,

परिपूर्णतेचा ध्यास आमच्या विद्यार्थ्यांना लागला पाहिजे व त्या दृष्टीने निबंधाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

कोणत्याही प्रकारच्या **निबंधाचे दोन भाग** पडतात. **एक भाग** म्हणजे **त्या त्या निबंधाचे मुद्दे** किंवा त्याचा **आशय** आणि **दुसरा भाग** म्हणजे त्या आशयाची अथवा **मुद्यांची मांडणी** म्हणजेच **निबंधाची शैली,** निबंधाचा आशय आणि शैली या दोन्ही दृष्टींनी जो निबंध उंची गाठू शकतो तो उत्तम ठरतो. नुसतेच मुद्दे चांगले आहेत. पण शैलीचा काही पत्ताच नाही. असा निबंध उकडलेल्या भाज्या अन् बिनफोडणीच्या दुधी भोपळयाच्या भाजीसारखा सकस पण बेचव, रुचिहीन होईल. तर सुंदर शैलीमधील पण मुद्दे गहाळ झालेला निबंध हॉटेलातील तळलेल्या भज्यांसारखा खमंग, रुचकर पण नि:सत्त्व, पोषणमूल्ये नसलेला असा वाटेल. मग निबंध कसा हवा? तर आईने जीव ओतून, प्रेमाने बनविलेल्या भरल्या वांग्याच्या भाजीसारखा, मस्त चमचमीत मसाले भातासारखा किंवा---- (या जागी तुमच्या आवडीचे पदार्थ डोळ्यापुढे आणा- पण तोंडाला पाणी सुटू देऊ नका!)

सर्वसाधारण पहिलीपासून दहावीपर्यंत शिक्षक वर्गामध्ये जेव्हा निबंधाची तयारी करून घेतात तेव्हा निबंधाचे मुद्दे कोणकोणते असतील ते वर्गात सांगतात किंवा मुले चर्चेमध्ये निबंधाचे मुद्दे सांगू शकतात. जसे पावसावर निबंध लिहायचा झाला तर खालीलप्रमाणे मुद्दे व उपमुद्दे यांचा आराखडा तयार करता येईल.

**१) उन्हाळ्यातील वातावरण –** उकाडा, तापलेली जमीन, तहानलेली झाडे, प्राणी, सूर्याचे दाहक, आग ओकणारे दर्शन इत्यादी.

**२) पहिल्या पावसाचे आगमन –** आकाशात जमलेले ढग, त्यांच्या हुलकावण्या, पावसाची आतुरतेने वाट पाहाणारा शेतकरी, सुसाट सुटलेले वारे, मधेच चमकणाऱ्या विजा, पहिल्या पावसाने मातीला येणारा सुगंध, पहिल्या पावसात भिजण्याची मजा, हवेत आलेला गारवा इत्यादी.

**३) सृष्टीत झालेले बदल –** वृक्ष, वेली रोपांना फुटलेली पालवी, जाई, जुई, कुंदाला येऊ लागलेल्या कळ्या, हिरवीगार कुरणे - (सृष्टीने पांघरलेला शेला) ऊनपावसाचा खेळ, इंद्रधनुष्य, ढगांमधून होणारा मनोहर सूर्यास्त, इत्यादी.

**४) प्राण्यांमधील बदल –** पावसात आंघोळी करणाऱ्या चिमण्या, डराँव डराँव करून उड्या मारणारे बेडूक, पिसारा फुलवून नाचणारे मोर, झाडांवर आश्रय घेणारे कावळे, छपराखाली दडून बसलेली कबुतरे, फुलांवरून उड्या मारणारी फुलपाखरे इत्यादी.

**५) शहरातील बदल –** मुलांची, मोठ्यांची पावसामुळे उडालेली तारांबळ, रेनकोट, छत्र्या यांची खरेदी, नद्यांना आलेले पूर, झोपडपट्ट्यात शिरलेले पाणी – वाहतुकीत

*(पान क्र. २१ वर पुढे चालू)*

**उन्हात तापून पावसात भिजल्याशिवाय भूमीला समृद्धी येत नाही.**

अ आ ए श्र त्र ऋ अ आ श्र त्र ऋ ए अ आ ए श्र त्र ऋ अ

अ आ ए ऐ ओ औ अं श्र त्र ऋ आ ए ऐ ओ औ अं श्र त्र ऋ

श्र श्रा श्रि श्री श्रु श्रे श्रै श्रो श्रौ श्रं श्रः त्र त्रा त्रि त्री त्रु त्रू त्रे त्रै

त्रो त्रौ त्रं त्रः अ आ इ ई उ ऊ ऋ ए ऐ ओ औ अं अः का खि

गी घु ङू चे छै जो झौ ञं टः ठ डा ढि णी तु थू दे धै नो पौ

फं ष: भ मा यि री लु वू शे षे सो हो ळं क्ष: ज्ञ श्र त्र क्व ख्य

ग्न ख्य ह् च्च छ्ज ज्ज झ्य ञ्च ट्ट ठ्ठ ड्ड द् ण्ण त्त थ्य

द्ध न्न प्प फ्य ब्ब भ्य म्न व ष्य क्र र्मी ल्ल व्व श्म ष्ट

स्म ह् ळ्ह श्य न्य त्य ठ्य ड्य द्व ढ्य व्य ह्य हे

ळ्व कृ खृ गृ घृ चृ जृ णृ तृ थृ दृ धृ नृ पृ भृ बृ मृ लृ

वृ श्रृ षृ सृ हृ ट्र ठ्र ड्र ढ्र ? ! ‘ ’ “ ” ; , . -- —

कॅ डॉ मॅ बॉ लॅ चॅ टॅ ढॅ फॅ अँ कँ मँ डँ सँ टँ चँ गँ वँ रँ

असत्य अस्सल अक्राळविक्राळ स्टोअर्स कॅल्शिअम

आम्ही आग्रा आफ्रिका आंबराई आत्माराम आजोबा

ओत ओहळ ओलसर रेडिओ ओबडधोबड ओहोटी

औट औषध औक्षण औंबी औक्षवंत औत औष्णिक

अंग अंत अंबा अंग अंध अंजन अंथर अंतिम अंडे

औरंगाबाद अंतर्देशीय औद्योगिक अंतःकरण अंगठी

एक एडका थिएटर एकूण एखादे एकोणतीस

ऐन ऐक ऐनक ऐरावत ऐतखाऊ ऐतिहासिक ऐंशी

श्रम आश्रम श्रावण अश्रू श्रीकांत श्रद्धा सर्वश्रेष्ठ

पत्र छत्र पवित्र सूत्र कृत्रिम संत्रे तंत्रज्ञ स्त्री सर्वत्र

ऋण ऋषी ऋतुमान ऋषिकुमार ऋतू ऋतुचक्र

खरा आनंद दुसऱ्यांना देण्यात असतो, घेण्यात नसतो.

प्रसन्नता सर्व सद्गुणांची जननी आहे.

कीर्ती म्हणजे गाजवलेल्या कर्तृत्वाचा सुगंध आहे.

जीवन हा हास्य आणि अश्रू यांचा सुरेख संगम आहे

लक्ष्याशिवाय मार्ग नाही, ध्येयाशिवाय जीवन नाही.

*(पान क्र. १६ वर पुढे चालू)*

तुंबलेल्या पाण्यामुळे निर्माण झालेले अडथळे, सर्दी खोकल्यांचा प्रादुर्भाव इत्यादी.

इथे सर्व मुद्दे दिलेले नाहीत. पण याप्रमाणे मुद्दे, उपमुद्दे, त्यातील तपशील नोंदविता येतील. एका निबंधात सर्वच मुद्यांची खिचडी केली पाहिजे असे नाही. आपल्या निबंधात कोणते मुद्दे येणार हे त्या मुलाला आतापर्यंत **मिळालेले अनुभव, त्याचे भोवतालच्या सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण, त्याचे इतर पुस्तकांचे सखोल वाचन** अशा अनेक घटकांवर अवलंबून आहे. खेड्यातल्या मुलाला पावसाची जी अनुभूती येईल ती शहरातल्या मुलाला येणे अवघड आहे. विहिरी भरल्या, शेतातली पिकं डोलू लागली किंवा काळ्या मातीचा गंध हा त्याच्या निबंधातून डोकावेल तर शहरातील मुलाला रेनकोट, छत्र्यांची खरेदी, शाळेला मिळालेली सुट्टी यांची चटकन आठवण होईल. आपण कधी गारा पडलेल्या पाहिल्याच नसतील अन वेचून खाल्ल्याच नसतील, जर त्याची मजा चाखलीच नसेल तर निबंधात मुद्दांचा उल्लेख येईलच कसा? पिसारा उलगडून नाचणारा मोर फारच थोड्या मुलांनी पाहिला असेल! त्याचं ते बेभान धुंद होऊन नाचणं आपण अनुभवलं तर ते शब्दांमधून मांडता येईल. यासाठी आपलं **अनुभवविश्व हे व्यापक, समृद्ध होण्याची आवश्यकता** आहे. आडातच नसेल तर पोहऱ्यात कोठून येणार याचे भान येणे आवश्यक आहे.

तीच गोष्ट सूक्ष्म निरीक्षणाची. निरीक्षण करताना आपल्या पंचज्ञानेंद्रियांचा उपयोग जागरूकपणे करायला हवा. डोळे, नाक, कान, जीभ व त्वचा यांनी भोवतालच्या सृष्टीतील संवेदना टिपल्या पाहिजेत. डोळ्यांना पाऊस कसा दिसतो. कानांना त्याचे वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे ध्वनी कसे ऐकू येतात. (टपटप, रिमझिम, धो धो सो सो इ.) पावसाच्या पाण्याने मातीच्या अत्तराचा घमघमाट आपले घ्राणेंद्रिय – नाक कसे हुंगते, पावसाच्या पाण्याची, गारांची चव जीभ कशी चाखते आणि पावसात भिजून अवघे अंग ओले चिंब होऊन अंगावर शिरशिरी कशी येते, रोमांच कसे उभे राहतात, बराच वेळ पावसात भिजल्यावर सुरुवातीला वाजणारी थंडी पळून जाऊन उबदार कसे वाटते हे सारे पंचज्ञानेंद्रियांनी अनुभवायचे आहे. या अनुभवांचे निरीक्षण, नोंदी यातून निबंधाचे मुद्दे डोळ्यापुढे येणार आहेत.

पाठ्यपुस्तकाखेरीज इतर काही वाचायला हवे आहे याचे भान नव्या पिढीने हरविले आहे असे मला वाटते. अन्य वाचन म्हणजे कॉमिक्स, उथळ चटपटीत कथा, जोक्स् इ. वाचणे एवढाच अर्थ त्यांना समजतो. अन्य दर्जेदार पुस्तकांचा परिचय मुलांना शिक्षकांनी, ग्रंथपालांनी, पालकांनी करून द्यायला हवा. खांडेकर, फडके, काणेकर यांचे लघुनिबंध, पु. लं. देशपांडेंनी रंगविलेली व्यक्ती आणि वल्ली, बटाट्याची चाळ, अपूर्वाई, विनोदाच्या आश्रयाने उभी राहिलेली व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, सावरकरांचे माझी जन्मठेप, सहा सोनेरी पाने, गांधी, विनोबा यांच्या सारख्यांची चरित्रे,

वैचारिक वाङ्मय--- काय वाचावे याची नोंद करायची म्हटले तर हे आख्खे मासिक भरून जाईल. प्रश्न असा आहे की आमचा ८वी, ९वी तील विद्यार्थी हे वाचतो आहे का? त्याला वाचनाची तहान लागलीय का? की टी.व्ही.च्या भूलभुलैय्यात तो हरवून गेला आहे? विविध प्रकारच्या वाचनातून आपल्याला विचारांचा, कल्पनांचा खजिनाच हाती लागतो, आपल्याला हवे असणारे मुद्दे, आशय तर त्यामुळे सापडतेच पण अनेक प्रकारच्या शैली, मांडणी, शब्दयोजना यांचा परिचय होतो. आपला शब्दसंग्रह अमाप वाढतो. त्यातून आपली स्वत:ची शैली तयार होत जाते. निबंध लिहिताना आवश्यक असे सुंदर शब्द धोधो कोसळणाऱ्या पावसांच्या सरींसारखे एकामागून एक बरसू लागतात. कागदावर सहजपणे उमटू लागतात. यासाठी ज्याला निबंध लेखनाची तपश्चर्या करायची आहे त्याने वर्षाला १००-२०० पुस्तके वाचण्याखेरीज अन्य पर्याय नाही!

निबंधाचे मुद्दे, उपमुद्दे यांचा आराखडा तयार करणे अतिशय आवश्यक आहे. जसजसे मुद्दे सुचत, आठवत जातील तसतशी त्यात भर घातली पाहिजे. या रीतीने मुद्यांची आघाडी भक्कम तयार केली पाहिजे. त्यानंतर त्यातील निबंधाला उपयुक्त असे **निवडक मुद्दे घेून त्यांचा क्रम डोळ्यांपुढे आणावा. एकातून एक मुद्दे उलगडत जातील यारीतीने त्यांची संगती लावावी.** निबंध वाचताना **त्यातील सलगता जाणवायला हवी.** जेवताना भातात खडा लागावा तसे हा मुद्दा मध्येच इथे कुठे उपटला असे वाचताना वाटता कामा नये!

निबंधाचा दुसरा भाग म्हणजे निबंधाची मांडणी, शैली. ही आत्मसात करण्यासाठी काही साधनेची गरज आहे. निबंधाच्या विषयानुसार त्यातील विचार, कल्पना अथवा भावना आपल्याला समर्पक चपखल शब्दांमध्ये व्यक्त करता येणे आवश्यक आहे. या शैली संबंधी कोणकोणत्या मुद्यांचा विचार करायला हवा? पहिली म्हणजे उचित अशी शब्दरचना व वाक्यरचना! यासाठी विशेषणे, क्रियाविशेषणे, वाक्प्रचार, म्हणी यांचे भांडार भरलेले हवे. यासाठी उपाय म्हणजे ८ वी पासून एक संग्रह वही तयार करायची! त्यामध्ये म्हणींचा संग्रह करा. वाक्प्रचारांचा संग्रह करा, सुभाषिते, सुवचने, सुविचार यांचा संग्रह करा. (आपल्या प्रबोधनच्या प्रत्येक अंकात सुविचार - कवितेच्या ओळी असतात. त्यांचा संग्रह तुम्हाला उपयुक्त होईल) याच्या पलिकडे जाऊन सुप्रसिद्ध कवींच्या सुप्रसिद्ध, उपयुक्त कवितांचा संग्रह करणे अतिशय आवश्यक आहे. या कवितांमधून नादमधुर, काव्यमय असे सुंदर शब्द आपल्याला हाती लागतील. ते निबंधामधून पेरता येतील. निळे आकाश काळ्या ढगांनी भरून गेले आहे असे म्हणण्या ऐवजी निळेशार आभाळ काळ्याभोर ढगांनी क्षणार्धात व्यापून टाकले या तऱ्हेची वाक्यरचना अधिक सुंदर वाटते. त्याचप्रमाणे गडद निळ्या आभाळाचा घुमट

काळ्याकुट्ट ढगांनी काळवंडून गेला–

*'नभ मेघांनी आक्रमिले'*

*'गडद निळे जलद भरून आले'*

*'शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले'*

अशा ओळींचा उल्लेख स्वाभाविकपणे आपल्याला मोहून टाकतो. पावसावर निबंध लिहायचा तर पावसावरच्या पाचपन्नास कविता तर मला सहज आठवताहेत. बालकवींची *'श्रावणमासी, हर्षमानसी'* मर्ढेकरांची *'आला आषाढ, श्रावण,*

आल्या पावसाच्या सरी।

किती चातकचोचीने

प्यावा वर्षाऋतु तरी,

'घनघनमाला नभी दाटल्या

कोसळती जलधारा'

'येरे घना येरे घना'

यासारखी भावगीते.

पाडगावकरांची

'पहिल्या हिरव्या तृणपात्याचा

आज असे सत्कार'

करंदीकरांची –

'रक्तरवीचे लावून कुंकुम्

संध्या ल्याली निळसर अंबर।'

संध्या आली झुलवीत झुलवीत

इंद्रधनूचा पदर मनोहर'

या ओळी, किंवा

मंगेश पाडगावकरांच्या–

'पश्चिम क्षितिजाच्या भाळावर

रुळे कुरळ बट डौलदार

सावळ्या ढगांची–

यासारख्या अधून मधून पेरता येणाऱ्या ओळी, अनिलांची 'पेर्ते व्हा...' ही त्यातलीच एक.

*'टपटपटप काय बाहेर वाजतेय ते पाहू.*
*चल गं आई चल गं आई पावसात जाऊ'*

पेडणेकरांची

'अवचित आला पाऊस

घेऊन सुट्टीची नोटीस

अलजेब्रातून जसे पडावे

मोराचे पीस'

यासारखी बाळगीते.

---- किती उदाहरणं देऊ तुम्हाला? अशा कविता नुसत्या वहीत जमवून भागणार नाही तर त्यातील महत्त्वाच्या ओळी मुखोद्गत हव्यात तरच परीक्षेमध्ये ऐनवेळी निबंध लिहिताना त्यांचा उचित वापर करता येईल त्यासाठी येता जाता आपली संग्रहवही आपल्या हाताशी हवी व वेळ मिळेल तेव्हा ती पुन: पुन: चाळायला हवी. शिक्षकांनी वर्गामध्ये सूचना फलकावर अशा कविता लावून ठेवल्या तर मुलांना त्या संग्रह वहीत नोंदविता येतील. वर्गात प्रगट काव्यवाचन करणे, चालीवर कविता म्हणणे, यामुळेही कवितांचे पाठांतर होण्यास मदत होईल.

निबंधाच्या प्रकारानुसार निबंधाची शैली बदलते. **वैचारिक निबंधात** सुसंगत तर्कशुद्ध विचार मांडणे महत्त्वाचे. विचार पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींच्या सुवचनांचे दाखले महत्त्वाचे ठरतात.

**कल्पनाप्रधान निबंध –** उदा.

ऋतुवर्णन, प्रवास वर्णन, जर तर चे निबंध यात तुम्हाला किती नावीन्यपूर्ण वेगळ्या कल्पना स्फुरतात ते महत्त्वाचे- त्यात उपमा, उत्प्रेक्षा, रूपक अशा अलंकारांनी नटलेल्या वाक्यांची पेरणी, कवितांच्या ओळींची अवतरणे शोभा वाढवितात. या प्रकारात तुमच्या प्रतिभेची झलक दाखवायला जास्त संधी मिळते.

**भावनाप्रधान निबंध** – उदा. व्यक्तिचित्रांचे रेखाटन- जीवनातील अविस्मरणीय प्रसंगांचे रेखाटन. यासाठी अलंकारिक शैली बोजड वाटते. तिथे प्रासादिक, सहज साधी वाक्येच मनाला भिडतात. तुम्ही प्रसंग किती भावनोत्कटतेने रंगवू शकता हेच तिथे महत्त्वाचे ठरते! याउलट लघुनिबंधामध्ये हलकीफुलकी प्रसन्न खेळकर शैली शोभून दिसते. यासाठी विविध प्रकारचे साहित्य वाचनात आले तर शैलींची ओळख होईल. कोणत्या शैलीला कोणती वाक्यरचना शोभून दिसेल ते समजून येईल.

निबंधातून कोणत्या रसाचा आविष्कार करायचा तेही आधी ठरवून ठेवायला हवे. एका पावसावरील निबंधातून विविध रसाविष्कार शक्य आहेत. धो धो पावसामुळे झोपडपट्टीत उडालेला हाहाकार वर्णन करून तुम्हाला गंभीर रसाचा आविष्कार करता येईल. तर पावसात घसरून पडल्याने अंगाला जो चिखल लागला त्या प्रसंगाचे वर्णन करून हास्यरसाचा आविष्कार करता येईल. पावसावरचा निबंध संपूर्णत: विनोदी शैलीत लिहिता येईल. (मुकुंद टाकसाळे यांचा पावसावरचा जून-जुलैच्या 'साप्ताहिक सकाळ' मधला लेख पहा.)

निबंधाच्या मांडणीशी संबंधित एक महत्त्वाचा भाग म्हणजे **निबंधाची सुरुवात व निबंधाच शेवट** कसा करायचा ते ठरविणे. हे दोन्ही वाचकावर किंवा परीक्षकावर खूप प्रभाव टाकत असतात. त्यासाठी स्वत:चा एक संकल्प हवा की माझा निबंध इतरांपेक्षा, नेहमीपेक्षा काही तरी वेगळा झाला पाहिजे. जे सगळ्यांना सुचतं तेच मीही लिहिलं तर मला जास्त गुण पडण्याची शक्यता कमी आहे. विशेषत: ज्यांना १० पैकी ६-७ गुण पडतात त्यांनी यासाठी अधिक प्रयत्न करायला हवा. एकाच निबंधासाठी निदान ४-५ तरी प्रकाराने सुरुवात करून पाहावी. सुरुवात प्रसंगाने, अवतरणाने, गोष्टीच्या उदाहरणाच्या दाखल्याने, कवितेच्या ओळीने अशी विविध प्रकारे करून पाहावी. त्यातील जी आकर्षक, उचित वाटेल ती निवडावी. जे 'सुरुवाती'बद्दल म्हटले तेच 'शेवटा'संबंधी म्हणता येईल. शेवट देखील वेगवेगळ्या ४-५ पद्धतींनी करून पाहावा व नंतर निवड करावी.

निबंध जर वेगळा व्हायला हवा असेल तर त्याची सुरुवात शेवट व मांडणी याच्यामध्ये अनपेक्षित, आश्चर्यकारक असे स्वरूप कसे आणता येईल याचा विचार करावा. उदाहरणार्थ 'माझा अविस्मरणीय प्रवास' असा निबंधाचा विषय असला की मुले लोणावळा, महाबळेश्वरा सारख्या एखाद्या प्रेक्षणीय स्थळाच्या सहलीविषयी

लिहितात. पण माझ्या जीवनाची गाडी प्रवासाला निघाली--- जन्मले ते पहिले स्थानक होते. मग प्रत्येक स्थानकावर प्रवासाच्या वेगवेगळ्या टप्प्यात कोण कोण व्यक्ती जीवनात आल्या. त्यांचे अनुभव सांगणे असाही वेगळा निबंध लिहिता येईल. यासाठी आपल्याला जाणीव असणं महत्त्वाचं आहे की मला काही वेगळा निबंध लिहायचाय!

सर्वांत शेवटी महत्त्वाचं म्हणजे निबंध निदान ३ ते ४ वेळा पुन: पुन्हा लिहिला पाहिजे. प्रत्येक वेळी लिहिण्यापूर्वी आधीच्या लेखनातील चुका टाळत व सुधारणा करत लिहित गेले पाहिजे. पहिल्यांदा लिहितो तेव्हा साधारण मुद्यांची मांडणी झालेली असते. पण शैलीविषयक पूर्ण विचार झालेला नसतो. दुसऱ्यांदा लिहिताना सुरुवात, शेवट, मुद्यांचा क्रम यात आवश्यक ते बदल करून पुन: लिहा. तिसऱ्यांदा लिहिताना प्रत्येक परिच्छेदात कोठे कोठे अवतरणे, कवितांच्या ओळी घालता येतील याचा विचार करून लिहा. अवतरणे व कवितांच्या ओळी घालता येतील याचा विचार करून लिहा. अवतरणे व कवितांच्या ओळींचा एकाच निबंधात पाऊस पाडू नका. त्यांचा अतिरेकही निबंधाची गुणवत्ता कमी करतो. चौथ्यांदा निबंध लिहिण्यापूर्वी निबंधातील प्रत्येक शब्द व वाक्यरचना नजरेखालून घाला. एक शब्द सुद्धा इकडचा तिकडे करायची गरज नाही. अशी देखणी, नेटकी वाक्यरचना जमली आहे का ते तपासा. निबंधात आवश्यक तिथे शब्दांचे, वाक्यांचे बदल करा व मग सगळा निबंध पुन: लिहा. आपले अक्षर सुंदर आले आहे ना? परिच्छेदाला समास सोडून, अंतर सोडून लिहिले आहे ना? आपले लेखन शुद्ध आहे ना? हे तर बघायला हवेच, ती अत्यावश्यक अशीच आणि कोणत्याही प्रकारच्या लेखनासाठी अपरिहार्य अशीच बाब आहे. या आघाडीवर आपण कच्चे असून चालणारच नाही.

तुम्ही शिक्षकांनी सांगितले तसे निबंध लिहित जाता. पण एकदा लिहिलेल्या निबंधात वर सांगितलेल्या दृष्टिकोनातून सुधारणा करीत नाही. त्यामुळे आहे तेथेच राहाता. या लेखातून जी वाट मी दाखविली आहे ती चोखाळून पाहा. कदाचित शिखरापर्यंत पोहोचणे तुम्हाला शक्य होईल आणि निबंधलेखनाचा हा प्रवासही कटकटीचा, दमछाक करणारा न होता, प्रसन्न आनंदाचा होईल.

अर्थात पण हे साध्य करायला प्रारंभी कष्ट घ्यावे लागतील. विविध सुट्ट्यांमध्ये स्वत:हून वेगवेगळ्या विषयांवर निबंध लिहिण्याचा सराव करायला हवा. वरील विविध तंत्रे वापरून लिहिलेले निबंध आमच्याकडे पाठवा. त्यात काय काय सुधारणा हव्यात हे आम्ही तुम्हाला कळवू. उत्तम निबंधांना अंकामध्ये प्रसिद्धीही देऊ. मग लागा कामाला.

शुभस्य शीघ्रम्!

# रंग ऋतूचे ! ऋतू रंगाचे !

**– चारुता पुराणिक, पुणे**

(आवाजाची चाहूल घेत रंगमंचावर सूत्रधाराचा प्रवेश)

**सूत्रधार :** हे शब्द कोणाचे ! ते गीत कोण गाते आहे ? हां आवाजाची चाहूल लागली ना तुम्हाला सर्वांना ! त्या तिथे सप्तरंगांची कमान कुणाच्या स्वागतासाठी दिमाखाने उभी आहे? कुणाचा स्नेहमेळावा भरला आहे? अरे, अरे, त्या आकाशातील मेघरंगांच्या पताका पाहा. हो, हे रंग कशाचे? रंग ऋतूचे – ऋतू रंगाचे !

(प्रेक्षकांना उद्देशून) – चला तर मंडळी आपणही सामील होऊया या रंगसोहळ्यात ! काय म्हणता – विज्ञान, संगणक या शब्दांच्या गर्दीत वेळ कुणाला आहे? खरंच मंडळी, ऋतू येतात – जातात. सृष्टी फुलते – त्यांचा अनुभव घ्यायला आजतरी वेळ काढा. ते पाहा त्या तिथे पलिकडे सारे ऋतू एकत्र जमलेत.

(एकेका ऋतूचा नृत्यमय हालचाली करीत प्रवेश)

तो पाहा ... कोकिळेचा सरगम, फुलांचा सुगंध घेऊन
हासत नाचत वसंत येतोय ...

**वसंत :** मी वसंत ! माझा रंग कोणता सांगू ? पर्णराशीचा तांबूस कोवळा रंग माझा ! ऐकलीत ती पिंपळाची रेशमी सळसळ? माझ्या स्वागताची गीते गात किलबिलणारे पक्षी घरटी बांधतायत ! सृजनाची तयारी हा ही एक रंग निर्मितीचा ! रंगातील सूर ऐकलात का? कोकिळेचे कुहू कुहू ! उन्हाचा लाही लाही करणारा तप्त रंग माझाच ! माझ्या रंगसुगंधी अस्तित्वाच्या खुणांच्या पाठोपाठ पाऊल पडते ते ग्रीष्माचे ! उग्र – तप्त !

**ग्रीष्म :** नसेल माझ्याशी तुझी नाजुकी ! असेल रंग माझा मळकट तर कधी चकचकीत – तप्त प्रकाशाचा ! पण नसलो मी तर जीवनदायिनी वर्ण अवतरेल का? तप्ततेतून तृप्ततेकडे वाटचाल करायची तर माझा रखरखीतपणा, माझे उग्र अस्तित्व हवेच ना ! ती पाहा पानगळीत पडलेली पिंपळाची सुकी पाने वर्षेला बोलावताहेत. 'येई वर्षा देवी' तिचा रंग कोणता ? तिलाच सांगू दे !

**वर्षा :** मी ऋतू वर्षा ! रंग माझा कृष्ण – निळा सावळा ! गडद निळ्या मेघांच्या रंगात शोधा मला ! रंग माझा मातीचा. वृक्षवेलींवर लपेटलेला पोपटी – हरित रंग

माझा ! जलधारांचा पारदर्शी जलरंग माझाच ! आणि ते सप्तरंगी इंद्रधनुष्य... हिरवे गालीचे... पानापानात उमटलेला सुखसमृद्धीचा रंग माझा ! तो पाहा माझ्या या रंगवर्षेत सुखावलेला शरद येतोय ! विचारू त्यालाच – शरदा रे शरदा, रंग तुझा कसा?

**शरद :** रंग माझा रूपेरी ! वर्षेचं अस्तित्व विरतं अन् माझा थंड गारवा पसरत येते शरद पौर्णिमा ! रंग माझा चांदण्याचा; उत्साहाचा; प्रसन्नतेचा; माझ्या पावलावर पाऊल टाकत आलेला तो हेमंत पाहिलात का? तूच सांग गड्या, तुझा रंग कसा ते ?

**हेमंत :** रंग माझा तेजाचा ! छाया प्रकाशाचा खेळ करणाऱ्या चंद्रबिंबाचा, ग्रहताऱ्यांचा अरे, अरे धुक्याचा लोट सवे घेऊन हा कोण बरं आला?

**शिशिर :** मी शिशिर, रंग माझा धुक्याचा, शांततेचा चिडीचुप्प थंडीचा, असे हे ऋतुचक्र. पुन्हा येईल वसंत ... फुलांच्या रंग गंधांचे वैभव सवे घेऊन.

**वसंत :** जाई, जुई, मोगरा यांचा भुलवणारा गंध !
आकाशातल्या चांदण्याचा मोहवणारा छंद !
मी आहे वसंत सूरसरगमात दंग !

**ग्रीष्म :** नको नको वाटणारा उन्हाळा म्हणजेच मी ग्रीष्म, जीवनदायी वर्षेचा आहे मी पितामह ! हिंदोळणाऱ्या फांद्या, झोकून देणाऱ्या नारळ झावळ्या जीवाच्या आकांताने वर्षेला खुणावणाऱ्या !

**वर्षा :** ग्रीष्माची खूण मनी पटली !
जलधारांनी रानेवने भिजली !

**शरद :** चांदण्याचा धवलसाज लेऊन आलो मी !

**हेमंत :** थंडीचे आवरण सवे घेऊन आलो मी !

**शिशिर :** शेकोटीची ऊब सवे घेऊन आलो मी !

**सर्व ऋतू :** हे शब्द आम्हा सहा ऋतूंचे ! दिवस येतो, रात्र येते, दिवस संपतो, रात्र संपते !
फिरून वर्षचक्र हे पुढेपुढेच जातसे !
मित्रांनो आम्हाला विसरू नका !
आमचे अस्तित्व दुर्लक्षू नका !

आम्ही सारेच एकत्र आलो आणि आपले रूप दाखवू लागलो तर काय होईल? एकाच वेळी कडक उन्ह, थरथरणारी थंडी, धुव्वाधार पाऊस, सारेच कसे उलटपालट होईल

**निवेदक :** ऋतुरंगाच्या या कहाणीशी उतू नये. मातू नये. निसर्गावर प्रेम करण्याचा वसा

टाकू नये. सृष्टीचे वैभव टिकण्यासाठी पर्यावरणाचे व्रत पाळावे. छोटी रोपे
घरी, दारी रूजू दे !
डोंगर चढणीवर बिया टाकू दे !
वटवृक्ष, पिंपळ यांची लावणी करू दे !
पाऊस, नक्षत्र, आकाश, फुले-पक्षी यांचे निरीक्षण होऊ दे !
सिमेंटच्या जंगलात झाडे पाने यांना स्थान देण्याचे भान असू दे !

**सर्वजण :** पानांच्या ठिपक्यात उन्हाची रांगोळी .....
चाहूल रानपक्ष्यांची, मेघांच्या पताका, उधळण रंगांची !
ग्रहताऱ्यांच्या भेटी, फुलांचा दरवळ,
सुगंधाचे झेले, गवताची मखमल !
रंग-रूप-रस-गंधाच्या या सोहळ्याने
हजारो उत्तराची कहाणी सफल संपूर्ण होवो !

---

## ● खुलासा ●

गेल्या १-२ महिन्यात अंक न मिळाल्याच्या सुमारे २५-३० तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. बहुतेक सर्वांना त्याची उत्तरेही पाठविली आहेत. पण सर्वांनाच एकदा याबाबतचा खुलासा करावा म्हणून काही गोष्टी येथे देत आहोत. आपल्याकडून भरून घेतलेल्या सभासद नोंदणी पत्रकांच्या आधारे सर्व पत्ते तपासूनच चिकटविले जातात व नंतर मोजून पोस्टात टाकले जातात. प्रत्येकाला अंक मिळावा यासाठी खूप काळजीपूर्वक हे काम केले जाते, असे असूनही प्रत्येक महिन्याला सुमारे २० अंक आम्हाला परत येतात. उदाहरणादाखल ४-५ जणांचे पत्ते खाली देत आहे त्यांचे ४ पैकी तीन अंक आमच्याकडे परत आले आहेत.

१) २९३१
सौ. यशोधरा फुलचंद जाधव
घ. नं. २९४ ब,
तालुका पोलीस स्टेशनच्या मागे,
सोलापूर

२) २७०
अस्मिता चंद्रकांत कुलकर्णी
से. नं. २५, २१७, एल.आय.सी.
कॉलनी, प्राधिकरण, सिंधूनगर,
पुणे - 411 044

३) ५०७
एस. ए. सामंत
रामोदी आळी, रामोदी चौकीजवळ,
वसई, ठाणे - 401 201

४) ३५५२
विभावरी रोहिदास पाटील
१०१, प्लॉट नं. जयहिंद शाळेजवळ,
जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे - 424 002

म्हणून आपल्याला विनंती आहे...

● आपल्याला अंक नियमित मिळत नसल्यास पोस्टात जाऊन आपला पत्ता एकदा तपासून घ्या व योग्य पत्ता आम्हाला पाठवा.

● पोस्टातील यंत्रणेमुळे नियमित अंक मिळत नसल्यास शाळेच्या पत्त्यावर अंक मागवा. तसे मुख्याध्यापक/पर्यवेक्षक यांना सांगा व आम्हालाही तसे कळवा.

## मुक्काम ४ था : संवेदनशीलता

**– डॉ. अशोक निरफराके**

शब्दांवर हुकमत कशी मिळवायची ते आपण पाहिले. त्यांच्या साहाय्याने काही ओळींची गमतीदार जुळवाजुळव कशी करायची हे देखील आपण पाहिले. आता आपल्याला शब्दांकडून अर्थाकडे वळायचे आहे.

चांगल्या शब्दांची आकर्षक रचना हा फक्त सांगाडा आहे. पण त्या सांगाड्यातला प्राण म्हणजे त्या रचनेतून सांगितला जाणारा अर्थ किंवा आशय. आशय म्हणजे काय काय? आशय म्हणजे अनुभवाचे आणि त्या अनुभवामुळे आपल्या मनात उमटणाऱ्या भावना, कल्पना किंवा विचार यांचे वर्णन आणि अनुभव म्हणजे आपल्याला जे डोळ्यांनी दिसते, कानांनी ऐकू येते, नाकानी हुंगता येते, जिभेने चाखता येते, त्वचेने जाणता येते ते ते सर्व. अवघड भाषेत यालाच शब्द–स्पर्श–रूप–रस–गंध यांच्या संवेदना असे म्हणतात. इतरांना न जाणवलेल्या गोष्टींचे वर्णन करता येणे हे प्रतिभेचे एक लक्षण आहे. म्हणूनच म्हणतात – 'जे न देखे रवी, ते देखे कवी !' यासाठी लागणारा गुण म्हणजे संवेदनशीलता. ती आपण प्रयत्न करून जास्त तल्लख बनवू शकतो. निरीक्षण करून वाढवू शकतो. त्यासाठी तुम्ही पुढील प्रयोग करून पहा. **१) निसर्गातील दृश्यांचे निरीक्षण**. उदा. – एखाद्या दिवशी अगदी पहाटे उठा आणि घराबाहेर अंगणात किंवा रस्त्यावर जाऊन आकाश, शेते, झाडे, पक्षी, पशू, रस्ते इ. चे निवांत मनाने निरीक्षण करा. आकार, रंग, हालचाली, आवाज, वास, अशा सगळ्यांची नोंद घ्या. नेहमीपेक्षा वेगळे काय काय आढळते आहे याकडे लक्ष द्या. ही सगळी निरीक्षणे वहीत टिपून ठेवा, नंतर हेच ठिकाण भर दुपारी, संध्याकाळी, चांदण्यारात्री, काळोख्या रात्री कसे दिसते ते पाहा आणि फरक लिहून ठेवा.

असे निरीक्षण करत असताना नुसत्या कॅमेऱ्याने, टेपरेकॉर्डरने किंवा तापमापकाने नोंद करावी अशा पद्धतीने शक्य तिथे आकडेवारी, मोजमापे, वापरून निरीक्षण करणे हा झाला वैज्ञानिक मार्ग. या सगळ्या अनुभवामध्ये रंगून जाऊन त्यांचे आपल्या मनावर ठसे उमटून देणे ही झाली कलावंतांची वाट.

**२) एकेका ज्ञानेंद्रियांची संवेदनशीलता वाढविणे** – फेनमन नावाच्या नोबेल पारितोषिक विजेत्या भौतिकशास्त्रज्ञाने आपली वास घेण्याची क्षमता कशी वाढविली ते आपल्या

आत्मचरित्रपर पुस्तकात लिहून ठेवले आहे. एका खोलीत पुस्तकांनी भरलेले कपाट, त्या खोलीत तीन माणसे जाणार, त्यावेळी फेनमन खोलीच्या बाहेर लांब उभा असणार. आत गेलेल्या तिघांपैकी कोणत्याही एका माणसाने कपाटातल्या पुस्तकापैकी कोणतेही एक पुस्तक बाहेर काढून पाच मिनिटे हाताळायचे आणि परत जागेवर ठेवून द्यायचे. मग फेनमनला आत बोलवायचे. फेनमन कपाट हुंगून त्यातले हाताळलेले पुस्तक नेमके बाहेर काढायचा आणि तिन्ही माणसांचे हात हुंगून पुस्तक हाताळणाराही बरोबर हुडकून काढायचा. हे कुणालाही प्रयत्नाने जमू शकेल असे त्याचे म्हणणे होते.

हे कसे करता येईल? स्वयंपाक घरात जाऊन डोळे मिटून बसा आणि कोणकोणते वास जाणवत आहेत त्याची नोंद घ्या. तसेच बागेत, रस्त्यात, किंवा शेतात जाऊन करा. आतापर्यंत न जाणवलेले कितीतरी वास तुम्हाला जाणवतील. यापुढच्या टप्प्यात भावाबहिणीची किंवा मित्राची मदत घ्या. तुम्ही डोळे मिटलेले असताना वेगवेगळ्या वस्तू त्याला तुमच्या जवळ आणायला सांगा. नुसत्या वासाने यातल्या किती वस्तू तुम्ही ओळखू शकता? हाच प्रयोग ओळीने काही दिवस केला तर हे प्रमाण वाढते का? करून बघा.

असाच प्रयोग वेगवेगळ्या पदार्थांच्या चवी आणि स्पर्श तसेच वेगवेगळे आवाज यांच्याही बाबतीत करून बघा. डोळ्यांचा वापर तर आपण पुष्कळच करीत असतो. पण याही बाबतीत प्रकाशाच्या आणि रंगांच्या वेगवेगळ्या छटा, झाडांचे आकार पाण्यातील प्रतिबिंबे, उन्हाचे कवडसे, इ. गोष्टींचे निरीक्षण करा.

नेहमीपेक्षा वेगळी वाटणारी निरीक्षणे आम्हाला लिहून पाठवा.

● ● ●


**शिक्षक-पालकांना सस्नेह निमंत्रण**

## मराठी मानसशास्त्र परिषद

**अधिवेशन ८ वे**

मराठी मानसशास्त्र परिषदेचे ८ वे अधिवेशन दिनांक १०, ११, १२ जानेवारी १९९४ या दिवशी ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे संपन्न होत आहे. यंदाच्या वर्षीच्या अधिवेशनाचा प्रमुख विषय -

## बुद्धिमापन व बुद्धिविकास

**तंत्र, मंत्र व उपयोजन**

अधिवेशनात सहभागी होण्याची अथवा आपला शोधनिबंध सादर करण्याची इच्छा असल्यास अधिक माहितीसाठी कृपया खालील पत्त्यावर त्वरीत संपर्क साधावा.

मराठी मानसशास्त्र परिषद,
अधिवेशन सचिव
प्रज्ञा मानस संशोधिका
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे - 411 030
दूरभाष क्र. ४३२६९१

# अस्मिता भाषेची – रचना देशाची

– सौ. अनघा लवळेकर

माणसाला आपली मातृभाषा किती प्रिय असते ! बोलता यायला लागताच बोबड्या बोलांना अर्थ प्राप्त होतो तो 'मातृभाषेत' – आईनं शिकविलेल्या भाषेत. आयुष्यभर ही मातृभाषा एखाद्या निष्ठावान मित्राप्रमाणे आपली संगत करते. आपले विचार इतरांपर्यंत पोचवते. आपल्याला रिझवते. इतरांना आपल्या हळूवार भावना उलगडून सांगते.

साधारणपणे एखाद्या विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांची भाषाही एक – समान असते. त्यामुळे आपोआपच त्या समाजात भाषेचा एक घट्ट बंध – एक नातं निर्माण होतं. जितकी भाषा अधिक प्राचीन, विकसित आणि जितका समाज विशाल तितकाच त्या भाषेबद्दलचा अभिमानही जास्त. स्वित्झर्लंड, ब्रिटन, ब्रह्मदेश, कोरिया, इस्रायल इ. देश आकारानं छोटे आणि त्यामुळे तिथल्या समाजात प्रमुख भाषाही मुख्यत्वे एकच ! त्यामुळे पूर्ण देशाची म्हणून एक भाषिक अस्मिता सहज तयार होते. पण भारतासारख्या खंडप्राय देशात हे कसं शक्य आहे? इथे काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हजारो वर्षांची संस्कृती लाभलेले विविधतेनं नटलेले अनेक प्रांत आहेत. मूळ भाषा जरी देववाणी – संस्कृत असली तरी त्या त्या प्रदेशाच्या इतिहासातील घटनांमुळे, प्रभावामुळे आजच्या भाषा खूपच भिन्न रूपे – स्वतंत्र रूपे दर्शवितात. (उदा. 'स्कंध – कंधा – खांदा') त्यामुळे त्या त्या प्रदेशाची अशी भाषिक अस्मिता निर्माण झाली आहे.

ब्रिटिशांच्या राजवटीत त्यांनी स्वत:चा राज्यकारभाराच्या सोयीनुसार भारताचे भाग पाडले होते. उदा. मुंबई इलाख्यात महाराष्ट्र, गुजराथ, सिंध, कर्नाटक इतक्या प्रांतांचा समावेश होता. मद्रास इलाख्यात तामिळनाडू, केरळ, आंध्र, ओरिसाचा समावेश होता. बंगाल इलाख्यात बंगाल, उत्तरप्रदेश, ईशान्येकडील छोटे प्रदेश गणले होते. शासनकर्ते इंग्रज, त्यांच्या कारभाराची भाषा इंग्रजी आणि तो करण्याकरता इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा. सामान्य माणसाचा त्याच्याशी संबंध फक्त लादलेले कर भरण्यापुरता.

स्वातंत्र्यात हे चित्र पालटलं! लोकशाही पद्धतीत सरकार निवडण्याचा हक्क मतदारांचा ! तेव्हा सरकारी कामकाजाची माहिती त्यांना कळली पाहिजे. या साऱ्याकरता मातृभाषेचा आधार घेणार नाही तर अन्य कशाचा?

काँग्रेसनेही स्वातंत्र्यापूर्वीच आपल्या अधिवेशनातून 'भाषावर प्रांतरचनेचे ठराव' मंजूर केले होते. पण यात एक धोका जाणवत होता तो म्हणजे – प्रांताचा अभिमान देशाभिमानापेक्षाही लोकांना महत्त्वाचा वाटेल की काय याचा. म्हणून पं. नेहरूंनी अशी रचना ताबडतोब करण्याकरता विरोध

दर्शविला तो याचसाठी ! १९५२ च्या लोकसभेत हा ठराव येऊनही बहुमताच्या जोरावर तो नामंजूर करविला होता. पण सर्वसामान्य माणसाच्या मनात मात्र आपल्या 'मातृभाषेचा' प्रांत असावा असं मनापासून वाटत होतं. त्यात वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती होताना दिसत नव्हती. त्यामुळे असंतोष खदखदू लागला. भ्रष्टाचार, सत्तापिपासू, विषमता असे अनेक विषवृक्ष फोफावू लागले.

आणि भाषिक प्रांतरचनेवरून पहिली ठिणगी पडली. 'पोट्टीश्रीमलू' या नेत्याने 'स्वतंत्र आंध्र' करीता प्राणांतिक उपोषण सुरू केलं. सरकारवर दडपण आलं. पण पं. नेहरू काही दाद देईनात. १५ डिसेंबर १९५२ ला 'पोट्टीश्रीमलू' यांचा मृत्यू झाला. याचा ठपका सरकावर ठेवून पूर्ण आंध्रभर तीव्र निदर्शने झाली. जाळपोळ, हिंसा, दंगेधोपे इ. ला ऊत आला. इतकी उग्र प्रतिक्रिया बघितल्यावर पं. नेहरूंनी २० डिसेंबरला 'स्वतंत्र आंध्र' ची घोषणा केली.

अर्थात या आंदोलनाला एकदा गती मिळताच ते थांबणं शक्य नव्हतं. बाकीच्या प्रांतातही भाषिक राज्याची मागणी तीव्रतेनं पुढं आली. लोकमताचं वाढतं दडपण लक्षात घेऊन अखेर या मागणीवर विचार करण्याकरता 'प्रांत पुनर्रचना समिती' ची स्थापना केली गेली. यात पं. हृदयनाथ कुंजरू, सरदार पण्णीकर व फाझलअल्ली हे तिघे होते. त्यांनी वेगवेगळ्या प्रांतांना भेटी देऊन या मागणीचा अभ्यास केला आणि ३० नोव्हेंबर १९५५ ला अहवाल सादर केला.

या अहवालानुसार रचनेत काही फेरबदल केले.

१) भारताची विभागणी पाच विभागात व पंधरा घटक राज्यात केली गेली.

२) आंध्र - तेलगु भाषिक, गुजराथ - गुजराथी भाषिक, तर मुंबई व्यतिरिक्त सर्व मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यात आले.

३) मुंबई, हिमाचल प्रदेश व त्रिपुरा हे केंद्रशासित ठेवण्यात आले.

महाराष्ट्रातील लोकांची मागणी होती 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची.' आपल्यावर अन्याय झाला आहे अशा कल्पनेने मराठी भाषिकांतही संतापाची लाट उसळली. ही मागणी पुढे रेटण्यासाठी काँग्रेसव्यतिरिक्तच्या सर्व पक्षांनी एकत्र येऊन 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन केली. एस. एम. जोशी याचे मुख्य नेते होते. आचार्य अत्र्यांनी आपल्या धारदार लेखणीने सरकारला बोचकारायला सुरुवात केली. सेनापती बापट, जयवंतराव टिळक, साम्यवादी विचारांचे कॉम्रेड भाई डांगे, असे विविध प्रवृत्तींचे लोक या लक्ष्याकरता एकजुटीने उभे राहिले.

ज्यांना ही मागणी न्याय्य वाटत होती अशा काँग्रेसजनांनीही चक्क पक्षाचे राजीनामे दिले. नामवंत अर्थतज्ज्ञ आणि त्या वेळचे भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख हे अशांपैकीच एक !

महाराष्ट्रात जोरदार आंदोलन सुरू झाले. हरताळ, संप, सभा, मिरवणुकी आणि त्यावर सरकारी प्रत्युत्तर म्हणून लाठीहल्ला, गोळीबार असं चक्र सुरू झालं. पं. नेहरूंच्या मुंबई-पुण्याच्या सभेवर जनतेनं समितीच्या आदेशानुसार कडकडीत बहिष्कार टाकला.

प्रतापगडावर छत्रपतींच्या पुतळ्याचे पं. नेहरू अनावरण करणार होते. तेव्हा मैलोनमैल काळी निशाणे घेतलेल्या लोकांनी त्यांच्यापुढे उग्र निदर्शने केली.

अखेर संयुक्त महाराष्ट्र समितीने ही लढाई राजकीय पटावरून लढण्याचे ठरविले. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुका आल्या होत्या. काँग्रेसच्या विरूद्ध सर्वत्र समितीचा उमेदवार उभा करण्यात आला. आणि खरोखरच जनतेने समितीच्या पारड्यात आपली मतं टाकली. १३३ पैकी फक्त ३२ जागा काँग्रेसला मिळाल्या. तरीही सरकारने मुंबई महाराष्ट्रात सामील करण्यास टाळाटाळ केली. (कारण मुंबई हे बडं व्यापारी शहर. इथल्या 'धनिकांचे' हितसंबंध जपण्याकरिता सरकारवर दडपण येत होतं. त्यात 'अल्पसंख्यांकांचा' स्वत:च कल्पिलेला बागुलबुवा त्यांना भेदरवत होता.)

पण मराठी जनताही जिद्दीला पेटली आणि लढा चालू राहिला. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचा शंभरावा वर्धापनदिन साजरा झाला तेव्हा वृद्धत्वाच्या त्या अवस्थेतही अण्णांनी 'संयुक्त महाराष्ट्र व्हावा' असं पं. नेहरूंना बोलून दाखविलं. जर ही मागणी मान्य केली नाही तर महाराष्ट्रातील काँग्रेसला काही भविष्यच उरणार नाही. हे जेव्हा स्पष्ट झालं तेव्हा कुठे १ मे १९६० ला विदर्भ, मराठवाडा आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. तरी सरहद्दीवरच्या अनेक गावांना नीट सर्वेक्षण न केल्याने योग्य प्रांतात स्थान मिळालं नाही. उदा. निपाणी हे कर्नाटकात का महाराष्ट्रात याचा वाद अजून चालू आहे.

या दोन धड्यांवरून सरकारने अन्यही काही भाषिक राज्यांची मागणी पूर्ण केली.

१ डिसें. १९६३ – नागालँड

१ नोव्हें. १९६६ – पंजाबचे विभाजन करून हरियानाची स्थापना

२५ जाने. १९७१ – हिमाचल प्रदेश स्वायत्त राज्य म्हणून घोषित

२०-२१ जाने. १९७२ – मेघालय, मणिपूर व त्रिपुरा ही राज्ये तर मिझोराम – अरूणाचल प्रदेश केंद्रशासित जाहीर (हे दोन्ही प्रदेश नंतर घटक राज्ये बनली)

भाषावार प्रांतरचना झाली खरी ! त्याचे काही फायदेही झाले. सामान्य माणसाला राज्यकारभार करणे सोपे झाले.

पण काही महत्त्वाचे धोके वेळीच उपाययोजना न झाल्याने आता गंभीर रूप धारण करू लागले आहेत. स्थानीय अस्मिता प्रसंगी राष्ट्राभिमानही विसरू पाहात आहे. दक्षिण भारतातील 'हिंदी भाषे'विरूद्ध झालेलं उग्र आंदोलन, पाणीवाटपावरून उसळलेल्या दंगली, स्वतंत्र गुरखालँड, झारखंड, विदर्भच्या मागणीनं या प्रदेशात कायम संघर्ष धुमसत आहे. अर्थात् या सगळ्यांच्या पाठीमागे जसं राजकारण आहे तसेच अतोनात बोकाळलेला भ्रष्टाचार आणि त्यामुळे काही दुर्लक्षित विभागात अडलेली विकास कामं हे ही आहेच !

'मातृभाषा' आपली खरीच पण अखेर हिंदुस्थान हे आपलं एकसंध, एकात्म राष्ट्र आहे आणि ते खरोखरच तसं बनावं म्हणून प्रसंगी प्रांताचा अभिमान बाजूला ठेवूनही देशाचा समग्र विचार करणं आवश्यक आहे.

● ● ●

**रहस्यकथा**

# तीन विद्यार्थ्यांचे साहस

**(उत्तरार्ध)**

**– विवेक पोंक्षे**

*दिपावली विशेषांकाच्या आधीच्या अंकात तुम्ही शेरलॉक होम्स्‌ची कथा वाचली. तीन विद्यार्थ्यांपैकी एक जण नक्कीच गुन्हेगार आहे. तो कोण हे तुम्हाला ओळखायला आले का? तुमचे उत्तर उरलेल्या कथाभागावरून पडताळून पाहा.*

संध्याकाळी घरी हॉटेलवर परतत असताना होम्स कॉलेजजवळच्या प्रत्येक स्टेशनरी मालाच्या दुकानापाशी थांबला. पण आज नशिब होम्सच्या बाजूने नव्हते. त्याने जमा केलेले पेन्सिलीचे छिलके दुकानदारांना दाखवून तशी एक पेन्सिल मागितली, पण प्रत्येक दुकानदाराने होम्सला सांगितले की तशी पेन्सिल त्यांच्याकडे मिळत नाही. हवे तर तशी पेन्सिल मागविता येईल.

हॉटेलवर परतल्यावर होम्स अतिशय शांत होता. सकाळी उठताच तो म्हणाला, ‘‘चला, वॉटसन, आपण प्रा. सोम्सकडे जाऊ. कालच्या घटनेमागचे रहस्य मला उमगले आहे.

होम्सला पाहताच प्राध्यापक महाशयांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. ते धावतच होम्सकडे आले आणि म्हणाले, ‘‘बरे झाले ! तुम्ही आलात. आता मला सांगा की मी परीक्षा होऊ देऊ की रद्द करू?’’ ‘‘अर्थात होऊ द्यात.’’ होम्स. ‘‘मग, त्या गुन्हेगाराचे काय?’’ प्रा. सोम्स. ‘‘तो परीक्षेला बसणार नाही.’’ होम्स त्वरीत उत्तरला. ‘‘म्हणजे तुम्हाला तो माहित आहे?’’ प्रा. सोम्सनी विचारले. ‘‘बहुतेककरून पण तुम्ही आता बॅनिस्टरला बोलावता का?’’ होम्सने आता परिस्थितीचा ताबा घ्यायला सुरुवात केली. होम्सला न्यायाधिशाच्या मूडमध्ये बघून आत आलेल्या बॅनिस्टरला आश्चर्याचा धक्काच बसला.

होम्सने बॅरिस्टरला पहिला प्रश्न केला. ‘‘बॅनिस्टर, काल तू जेव्हा मटकन खुर्चीत बसलास तेव्हा आतल्या खोलीतील एखादी वस्तू दिसू नये अशा पद्धतीने बसलास ना ? हा हे फक्त मी सुचवतो आहे.’’ ‘‘नाही, मुळीच नाही.’’ ‘‘ठिक आहे, पण माझे असे म्हणणे आहे की त्यानंतर प्रा. सोम्स माझ्याकडे आल्यावर आतल्या खोलीत लपलेल्या व्यक्तीला तेथून सुखरूप बाहेर पडण्यास तू मदत केलीस.’’ ‘‘खरेच, आतमध्ये कोणीही व्यक्ती नव्हती.’’ ‘‘बॅनिस्टर आतापर्यंत तू खरे बोलत होतास पण आता मात्र तू खोटे बोलतो आहेस.’’

होम्सने बॅनिस्टरला खोलीच्या कोपऱ्यात थांबायला सांगितले आणि वर राहणाऱ्या गिलख्रिस्ट या विद्यार्थ्याला बोलावणे पाठविले. गिलख्रिस्टला पाहताच बॅनिस्टरचा संयम सुटला आणि तो म्हणाला, ‘‘मि. गिलख्रिस्ट मी काहीही सांगितले नाही.’’ ‘‘पण या एका वाक्याने तू बरेच काही सांगून टाकले आहेस’’ होम्सचे हे वाक्य ऐकताच गिलख्रिस्टने निराशेने आपले तोंड दोन्ही तळव्यांत लपवले आणि तो हुंदके देऊ लागला.

होम्सने आता गुन्हा कसा घडला ते

सांगायला सुरुवात केली. ''छापखान्यातल्या कोणी हे कृत्य करणे शक्यच नव्हते. कारण त्यांना ते पेपर तेथेच पाहता आले असते. मग हे कागद म्हणजे प्रश्नपत्रिका आहेत हे कुणाला कळले असेल? तुम्हाला काल आश्चर्य वाटले असेल की मी खिडकीचे निरीक्षण का करत होतो? खिडकीच्या व्हेंटीलेटर्समधून आतल्या टेबलावरचे कागद दिसू शकतात. अर्थात ती व्यक्ती सहा फूटांपेक्षा उंच हवी. तेव्हा त्या तिघातला जो इतका उंच असेल त्यावरच संशय बळावतो. जेव्हा काल मला कळले की गिलख्रिस्ट ॲथलेट आहे आणि लांब उडी मारतो तेव्हाच माझ्या दृष्टीने तोच खरा संशयित होता. अर्थात ते सिद्ध करण्यासाठी मला आणखी पुरावे हवे होते. घडले ते असे. गिलख्रिस्ट मैदानावरून सराव करून परतला तेव्हा त्याच्या हातात लांब उडी मारताना घालायचे बूट होते. या बुटांना तळाला अणकुचीदार खिळे असतात ही गोष्ट ध्यानात ठेवा. जाताजाता सहजच त्याच्या नजरेला प्रश्नपत्रिका पडल्या. दरवाज्याला बॅनिस्टरच्या वेंधळेपणाने किल्ली तशीच होती. मोह झाल्याने दरवाजा उघडून गिलख्रिस्ट आत शिरला. त्याने बूट टेबलवर ठेवले आणि खुर्चीवर काहीतरी ठेवले. ''खुर्चीवर तू काय ठेवले होतेस?'' होम्सच्या या प्रश्नाला गिलख्रिस्टने उत्तर दिले, ''हातमोजे'' ''हा तर हातमोजे खुर्चीवर ठेवून तू भराभर प्रश्न उतरवून घ्यायला लागलास. पण तुझ्या दुर्दैवाने प्राध्यापक महाशय समोरच्या दरवाज्याने न येता बाजूच्या दरवाजाने आल्याने तुला आधी दिसले नाहीत. त्यामुळे बूट उचलून घाईघाईने तू शेजारच्या खोलीत पळालास. घाईने बूट उचलल्याने त्या टेबलावर खिळ्याचा ओरखडाही उमटला. त्या बुटाला लागलेले चिखलाचे गोळे टेबलावर आणि आतल्या खोलीत पडले. आज सकाळीच मी मैदानावर जाऊन ती ओली माती पाहून आलो. बॅनिस्टर आत आल्यावर त्याने ते हातमोजे पाहिले व गुन्हेगार कोण ते त्याच्या लक्षात आले. प्रा. सोम्सना ते सांगण्याऐवजी तो ते लपवण्यासाठी खुर्चीवर बसला आणि नंतर प्रा. सोम्स माझ्याकडे आल्यावर गुन्हेगाराला खोलीत बंद करण्याचे सोडून त्याला पळून जाण्यासही मदत केली. गिलख्रिस्टनेच गुन्हा केला हे मला कालच समजू लागले. पण बॅनिस्टर तू असा का वागलास?''

बॅनिस्टर होम्सच्या हुषारीचे कौतुक करत म्हणाला, ''सर! ते तुम्हाला कळणे जरा अवघडच आहे. फार पूर्वी मी गिलख्रिस्टच्या वडिलांकडे नोकरीला होतो. तेव्हाचे त्यांचे उपकार स्मरून मी त्याला वाचवणे स्वाभाविक नव्हते का? पण आता गिलख्रिस्टला त्याच्या कृत्याचा पश्चाताप झाला आहे. तो परीक्षेला बसणार नाही. तुम्ही त्याला माफ करा.''

होम्स खुर्चीवरून उठला आणि प्रा. सोम्सना म्हणाला, ''चला आम्ही आता निघतो. तुमचा प्रश्न सुटला आहे आणि माझ्याही पोटात कावळे ओरडायला लागले आहेत. न्याहारी माझी वाट पाहात असेल.''

*(सोलापूर येथील कु. सीमा कुलकर्णी हिने खरा गुन्हेगार योग्य तर्काने शोधून काढला त्याबद्दल तिचे अभिनंदन !)* ● ● ●

# प्र बो ध कां चे मे ळा वे

येत्या तीन महिन्यांमध्ये पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर, सांगली, धुळे, नगर, ठाणे व लातूर या ठिकाणी प्रबोधनच्या सर्व सभासदांचे मेळावे होणार आहेत. (याव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यांमधील सभासदांची संख्या व त्यांचा प्रतिसाद यावर तेथील मेळावे ठरविले जातील) या मेळाव्यांमध्ये छात्र प्रबोधनच्या संपादकांशी गप्पा, हस्तकौशल्य शिकणे, विज्ञानप्रयोग–कथाकथन–वाचनकौशल्य–प्रतिभाविकसन यापैकी एक, एकमेकांच्या ओळखी अन् गमतीजमतीचे खेळ, छोट्या स्पर्धा, गंमतजत्रा इ. विविध कार्यक्रम असतील. स्थानिक परिस्थितीनुसार कार्यक्रमात थोडेफार बदल होतील. एप्रिलमधील वासंतिक शिबिराची निश्चिती (मेळाव्यातील प्रतिसादावर आधारित) होईल. सभासदांच्या मेळाव्याला जोडूनच त्यांच्या पालकांचा–शिक्षकांचाही एक मेळावा असेल. त्यामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोगांची माहिती व त्यातील कोणते उपक्रम स्थानिक पातळीवर कसे राबविता येतील यासंबंधी चर्चा होईल. मेळाव्याचे दिवस व जागा त्या त्या महिन्याच्या मासिकात जाहीर केल्या जातील.

**● या महिन्यातील मेळावे ●**

***सांगली : १९ डिसेंबर ९३, रविवार, दु. २ ते ६***

*(जागेसंबंधीची निश्चिती झाल्यावर शाळाशाळांमधील सूचनाफलकावर त्याची पत्रके लागतील.)*

***पुणे : २६ डिसेंबर ९३, रविवार, दु. २ ते ६***

***स्थान : ज्ञान प्रबोधिनी भवन, ५१०, सदाशिव पेठ, पुणे–३०.***

***दोन्ही ठिकाणी शिक्षक पालक मेळावा सायं. ५.३० ते ७.००***

***विषय : विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला खतपाणी कसे घालावे?***

विद्यार्थ्यांनी बरोबर येताना कात्री, ब्लेड, सुई, फेविकॉल, वही, पेन व गंमतजत्रेसाठी सुमारे ५ रुपये बरोबर घेऊन यावे.

छात्र प्रबोधनची पूर्वीची मासिके, ज्ञान प्रबोधिनीची अन्य पुस्तके, स्वामी विवेकानंदांची छायाचित्रे (यांच्या किमती आधीच्या अंकांमध्ये दिलेल्या आहेत.) विक्रीसाठी उपलब्ध असतील. सभासद नसलेल्या मित्रमैत्रिणींनाही मेळाव्यास घेऊन येण्यास हरकत नाही. त्यांना या मेळाव्यासाठी २ रुपये शुल्क भरावे लागेल.

**सर्व सभासद व पालकांनी या मेळाव्यांना आवर्जून व अगत्याने यावे.**

## १० वी अभ्यास मार्गदर्शन पुस्तिका

१० वी म्हणजे शालांत परीक्षा ! आत्ताची परीक्षापद्धती जरी बुद्धीच्या सर्व गुणांना वाव देणारी नसली तरी आपल्या सर्वांना अजून काही वर्षे तरी (काही वर्षांनंतर त्यात स्वागतार्ह बदल होतील अशी आशा करूयात.) याच परीक्षापद्धतीतून यशस्वीपणे पुढचा मार्ग आक्रमायचा आहे. त्यामुळे परीक्षा तंत्र समजून घ्यायलाच हवे अन् त्याच बरोबर अभ्यासाच्या विविध पद्धती अन् तंत्रांचाही वापर करून बघायला हवा. या सर्वांसाठी सुमारे ८० पानांची एक अभ्यास मार्गदर्शन पुस्तिका १५ डिसेंबर ९३ पर्यंत प्रकाशित होत आहे. प्रामुख्याने १० वी च्या विद्यार्थ्यांना येत्या तीन महिन्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने त्यात अनेक महत्त्वाचे विषय हाताळले आहेत.

- *वेळेचं, अभ्यासाचं नियोजन कसं करावं?*
- *लक्षात राहण्यासाठी विविध प्रकारचे तक्ते कसे तयार करावेत?*
- *पाठांतर कसे करावे?*
- *विषयांनुसार अभ्यासपद्धतीत कोणकोणते बदल करावेत.*
- *कंटाळा घालविण्यासाठी काय करावे?*
- *अभ्यासाची परिणामकारकता कशी वाढवावी?*
- *प्रयोग परीक्षेची तयारी कशी करावी?*
- *प्रश्नपत्रिका सोडविण्याच्या विविध पद्धती व त्याचे फायदे कोणते?*
- *शेवटच्या आठवड्यात अन् परीक्षेच्या आदल्या दिवशी अभ्यासाची उजळणी कशी करावी?*
- *उत्तरपत्रिका कशा लिहाव्यात?*

इ. सारखे विषय या पुस्तिकेत असणार आहेत.

**किंमत रु. २५/-**

**सभासदांसाठी सवलतमूल्य रु. २०/-**

सभासदांनी आपला पावती क्रमांक कळवणे/सांगणे आवश्यक आहे.


छात्र प्रबोधन

हे मासिक **'ज्ञान प्रबोधिनी'** या संस्थेच्या मालकीचे असून सौर १ मार्गशीर्ष शके १९१५ (२२ नोव्हेंबर, १९९३) या दिवशी प्रभात प्रिंटींग प्रेस, गुलटेकडी येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

**● संपादक, प्रकाशक ●**

श्री. महेन्द्र सेठिया

**● संपादक मंडळ ●**

महेंद्र सेठिया, B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे, M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर, M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**● रेखाचित्रकार ●**

श्री. दीपक संकपाळ

**● संपर्क ●**

**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.
☎ ४३२६९१

**● मुद्रक ●**

प्रबोध संपदा,
पुणे ४११ ००२.

**● वार्षिक वर्गणी ●**

रु. ४०/-

**● नोंदणी क्रमांक ●**

PHR/153/VIII

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन PNCW/349     तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# रूप पालटू देशाचे .....

– विनय हर्डीकर

***नव्या युगाचे पाईक आम्ही तारे नवक्षितिजावरचे***
***निजरुधिराची आण वाहुनि रूप पालटू देशाचे ।।***

*आद्यकवींनी चित्रियलेली भूमी ही सुजला, सुफला*
*रुप तियेचे आज पाहुनी चीड चेतवी चित्ताला*
*सुजल-सुफलता पुन्हा निर्मिण्या कोटि कोटि व्यापू गगने*
*भागिरथीला प्रसन्न करण्या वाहू यत्नांची सुमने*
*घराघरातुन मनामनातुन दीप चेतवू स्फूर्तीचे ।।१ ।।*

*यंत्रदेव तो पूज्य अम्हाला पूज्य अम्हाला वेदऋचा*
*विज्ञानावर भक्ति असुनही गंध मोहवी काव्याचा*
*पूजनीय तो उंच हिमाचल पूज्य अम्हाला सागर हा*
*भव्यत्वाची साक्ष ज्यामध्ये पूजा त्याची करू महा*
*या सर्वांच्या पूजांमधुनी पूजन करू या शक्तीचे ।।२ ।।*

*समोर मूर्ति मातृभूमिची आज न काही प्रिय दुसरे*
*शुद्ध मनाचे कोंदण करुनी तिच्या रुपाचे जडवू हिरे*
*स्वयंप्रकाशित अम्ही काजवे दुष्ट ग्रहांवर मात करू*
*आकांक्षांच्या पूर्तीसाठी मृत्यूशीही होड धरू*
*त्यागपत्र हे आजच लिहिले अवघ्या जीवनपुष्पाचे ।।३ ।।*

**● संपर्क पत्ता ●**
**संपादक, 'छात्र प्रबोधन',**
**ज्ञान प्रबोधिनी,**
**५१० सदाशिव पेठ,**
**पुणे 411 030.**
**☎ : ४३२६९१**
**कार्यालयाची वेळ : स. १० ते १२,**
**संध्या. ५ ते ७.**
**वार्षिक वर्गणी : रुपये ४०/- फक्त.**